cmyk

## संपादकीय

### वंदे मातरम परिमाण नाही वास्तव स्वीकारावे लागेल !

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्फूर्तीदायक गीत असलेल्या 'वंदे मातरम्' या रचनेला दीडशे वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने भारतीय संसदेत विशेष चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चेदरम्यान सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी विशेषतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'वंदे मातरम्' गीताला समोर ठेवून विरोधी पक्षांना विशेषतः काँग्रेस पक्षाला लक्ष्य केले


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२२४ | गुरूवार दि.११ डिसेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## आज नागपूर अधिवेशनात...



### नागपूर ते चंद्रपूर महामार्गास सुधारित मान्यता

नागपूर ;नागपूर – चंद्रपूर शीघ्रसंचार द्रुतगती महामार्ग अंतर्गत केंद्र शासनाच्या गतीशक्ती पोर्टलकडून प्राप्त सूचनांचा विचार करून एकूण २०४ किलोमीटर लांबीच्या सुधारित रस्ता आखणीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. मुंबई शहरातील घाटकोपर पूर्व, चेंबूर आणि अंधेरी (प.) आंबिवली मुद्रण कामगार नगर व चुनाभट्टी येथील भूखंडांचा खासगीकरणाच्या माध्यमातून विकासाच्या मुदतवाढीस देखील आज आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

### दारू दुकानांच्या स्थलांतरास एनओसी बंधनकारक

नागपूर ; राज्यात एफ.एल२ आणि सी.एल३ परवानाधारक विदेशी व देशी दारू किरकोळ विक्री केंद्रांच्या स्थलांतरासाठी नोंदणीकृत सोसायटीची एनओसी अनिवार्य करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असल्याची माहिती उपमुख्यमंत्री व उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली.सदस्य शंकर जगताप यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते.

### पुण्यातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी भुयारी मार्ग

नागपूर,: पुणे शहरातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी स्वारगेट, शनिवारवाडा येथे तीन मार्गिकेचे दोन भुयारी मार्ग तयार करण्याचे काम पुणे महानगरपालिका किंवा सार्वजनिक बांधकाम विभाग यापैकी कोणी करावे, यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लवकरच निर्णायक बैठक घेणार असल्याची माहिती मंत्री डॉ.उदय सामंत यांनी विधानसभेत दिली.विधानसभा सदस्य हेमंत रासने यांनी यासंदर्भात एक लक्षवेधी सुचनेद्वारे विचारणा केली असता मंत्री डॉ.सामंत यांनी उत्तर दिले. पुणे महानगरपालिकेला डीपीआर आणि मास्टर प्लॅन तयार करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले होते.

### शिंदेंचे मंत्री भरत गोगावलेंवर कॅशबॉम्ब

रायगड :शिवसेना शिंदे गटाचे आमदार महेंद्र दळवी यांच्या कॅशबॉम्बनंतर आता आणखी एका मंत्र्याचं प्रकरण समोर आलं आहे. शिवसेनेचे मंत्री भरत गोगावले यांचा नोटांच्या बंडलासोबतचा व्हिडीओ समोर आला आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी हा व्हिडीओ समोर आणला आहे. त्यामुळे ऐन अधिवेशनाच्या काळात शिंदे गटाच्या अडचणीत वाढ झाल्याचं चित्र आहे.या आधी ठाकरेंचे नेते अंबादास दानवे यांनी शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी यांच्या नोटांसह व्हिडीओ समोर आणला होता. ते प्रकरण चर्चेत असतानाच आता त्यांच्याच पक्षाचे मंत्री भरत गोगावलेंचाही व्हिडीओ समोर आला आहे.

### सभागृहात रोहित पवारांचे शिंदेंना चिमटे

नागपूर : ''जामखेड नगरपरिषदेची निवडणूक सुरू असताना आमचे कार्यकर्ते सूर्यकांत मोरे यांनी राम शिंदे यांच्यावर टीका केली. ती टीका शिंदे यांच्या पदावर नव्हती. मात्र, त्या टीकेने शिंदे यांचा अहंकार दुखावल्यामुळे त्यांनी गल्लीतील भांडण सभागृहात आणले आणि हक्कभंगाची कारवाई केली. त्यांनी पदाची गरिमा राखायला हवी होती. त्यासाठी आवश्यक पडल्यास त्यांनी फडणवीस किंवा नार्वेकरांकडून क्लासेस घ्यावे'', असा टोला रोहित पवार यांनी सभापती राम शिंदे यांना लगावला. मोरेंवरील कारवाई गल्लीतील भांडण सभागृहात आणण्यासारखे असल्याचा उल्लेख केला.

### अनिल परब यांचा सभागृहात गंभीर आरोप

नागपूर : राज्यातील जलसंधारण विभागात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार सुरू आहे. आवश्यक असलेल्या दराच्या सात ते आठव पटींनी निविदा काढल्या जात आहेत. बोगस कंत्राटदार पोसले जात आहेत. या विभागाचे संचालक सुनील कुशिरे सांगतात की, ते सभागृहात लक्षवेधी किंवा प्रश्न लागूच देणार नाही, हे संपूर्ण विधिमंडळच माझ्या खिशात असल्याची वक्तव्ये कुशिरे बाहेर करीत असल्याचा खळबळजनक आरोप परिषदेतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अनिल परब यांनी मंगळवारी विधान परिषदेत केला.अनिल परब यांनी तारांकित प्रश्नाद्वारे हा मुद्दा उचलला होता.

### राज्यात गुटखा विक्रीप्रकरणी मकोका लावणार

नागपूर : गुटखा ,मावा, सिगारेट, सुपारी, मान मसाला व चरस गांजाची विक्री प्रतिबंधीत असून आजही मोठया प्रमाणात गुटखाच्या माध्यमातून? ड्रग्जचीही विक्री होत आहे. याप्रकरणी कारवाई झाल्यावरही आरोपी मोकाट सुटतात. त्यामुळे यासंदर्भातील कायदे अधिक कडक केले जातील. तसेच, त्यात अधिक सुधारणा करून अशा प्रकरणी मकोका लावणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रश्नोत्तराच्या तासात दिली. प्रतिबंध घालण्यासाठी कमकुवत कायदा अधिक कठोर व कडक करण्यासाठीचे निर्देश कायदा व विधी विभागाला सांगण्यात आले. मकोका लावतानाच त्यांच्यावर एनसीओसी करता येईल.

### तुळापूर व वढूबुद्रक विकास आराखडा

नागपूरः स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे पुणे जिल्ह्यातील बलिदान स्थळ तुळापूर (ता. हवेली) व समाधी स्थळ मौजे वढू बुद्रुक (ता. शिरूर) दरम्यान नवीन रस्त्याची निर्मिती व भीमा नदीवरील पूल विकासकामांचा अंतर्भाव असलेल्या ५३२.५१ कोटी किमतीच्या विकास आराखड्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विकास आराखडा शिखर समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

# 129 कारखान्यांकडे 2 हजार कोटींची एफआरपी थकित !

**पुणे । प्रतिनिधी**

**स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी, ऊसदरानंतर आता थकित एकरकमी एफआरपी प्रश्नी आक्रमक भूमिका घेतली आहे. राज्यातील १६३ साखर कारखान्यांचा गळीत हंगाम सुरू होवून जवळपास ४० दिवस उलटले आहेत. पण पहिल्या १ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर अखेर गाळप केलेल्या उसाची जवळपास २ हजार कोटी रूपयांची बिले थकविली आहेत. यामुळे तातडीने संबधित साखर कारखान्यांच्यावर आर. आर. सी अंतर्गत कारवाई करावी आणि शेतकऱ्यांची थकीत ऊसबिले तातडीने देण्याबाबत आदेश द्यावेत, अशी मागणी राजू शेट्टी यांनी साखर आयुक्तांकडे पत्राद्वारे केली आहे.**



राज्यातील साखर हंगाम १ नोव्हेंबरपासून सुरू झाला. चालू हंगामात राज्यातील १६३ साखर कारखान्यांनी १५ नोव्हेंबर अखेर जवळपास १ कोटी १० लाख टन ऊस गाळप केले. यातील ३४ साखर कारखान्यांनी १०० टक्के एफआरपी उत्पादक शेतकऱ्यांना अदा केली. पण अद्याप १२९ साखर कारखान्यांना जवळपास २,००५ कोटी रूपयाची एफआरपी थकित आहे. यामुळे ही थकीत एफआरपीची रक्कम १५ टक्के व्याजासह शेतकऱ्यांना द्यावी, असे शेट्टी यांनी पत्रात म्हटले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वोच्च न्यायालयात एकरकमी एफआरपीच्या विरोधात आव्हान याचिका दाखल करत, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना तीन टप्प्यात एफआरपी देण्याची मागणी केली आहे. यावर सुनावणी सुरू असून येत्या १७ डिसेंबर रोजी पुढील सुनावणी होणार आहे. ९ नोव्हेंबर रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान राज्य


▶▶ पान २ वर

# लाडक्या बहिणीवरून विधानसभेत भावाभावत जुंपली

## २१०० रुपये कधी देणार? ; विरोधकांचा सरकारला घेरण्याचा प्रयत्न

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील महायुती सरकारची महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' पुन्हा एकदा विधिमंडळात गाजली. आज (बुधवार, १० डिसेंबर) हिवाळी अधिवेशनादरम्यान या योजनेतील कथित घोटाळा, केवायसी संदर्भात महिलांना येणा–या अडचणी व वाढीव २१०० रुपयांचा हप्ता यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी झाली.आज लाडक्या वाहिनीवरून सभागृहात भावाभावत चांगलीच खडाजंगी झाल्याचे पहावयास मिळाले.**




'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' ही राज्य सरकारची एक लोकप्रिय आणि महत्त्वाकांक्षी योजना आहे. सध्या पात्र महिलांकडून केवायसीची प्रक्रिया करून घेतली जात आहे. या प्रक्रियेदरम्यान महिलांना अनेक अडचणी येत आहेत. दुसरीकडे नियमांचे उल्लंघन करून लाभ घेणा–या अनेक लाडक्या बहिणींची नावे लाभार्थी यादीतून वगळण्यात आली आहेत. या सर्व मुद्यांवर आज राज्य विधिमंडळात मोठी खडाजंगी झाली. विधानसभेत या विषयावर बोलताना काँग्रेस नेते नाना पटोले यांनी गंभीर आरोप केले. ते म्हणाले, लाडकी बहीण योजनेत मोठा घोळ झाला आहे. आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक यांना कामाला

▶▶ पान २ वर

### विरोधकांनी संभ्रम निर्माण करू नये : तटकरे


'नावनोंदणीसाठी सक्षम पोर्टल आणि ऑफलाईन अशा दोन्ही सुविधा देण्यात आल्या होत्या. त्यामुळे यात कोणताही गोंधळ झालेला नसून विरोधकांनी विनाकारण संभ्रम निर्माण करू नये. पहिल्याच शासन निर्णयात २ कोटी ६३ लाख लोकांची पडताळणी सुरू केली. इतर विभागातही आम्ही डेटा तपासतोय. ई–केवायसीचे धोरण आणले, असे प्रत्युत्तर मंत्री अदिती तटकरे यांनी दिले.

### बोगस लाभार्थ्यांवर कारवाई ? जयंत पाटील

निवडणुकीत जेव्हा ही योजना झाली, तेव्हा अशा अटी यापूर्वी सांगितल्या होत्या का? ज्या लोकांनी याचा चुकीचा फायदा घेतला त्यांच्यावर कारवाई करणार का? योजना जड जाऊ लागल्याने आता केवायसी आणि कंडिशन योजनांमध्ये घेतले आहेत, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी केली.

### २१०० रूपय योग्य वेळी देवू–एकनाथ शिंदे

विरोधकांच्या प्रश्नांवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आक्रमक शैलीत उत्तर देत म्हणाले, तुम्ही लाडकी बहीण योजनेवर बोलू नये. तुम्ही सुरुवातीपासून या योजनेला विरोध केला, म्हणूनच विधानसभा निवडणुकीत लाडक्या बहिणींनी तुमचा पराभव केला. महिलांना २१०० रुपयांची वाढीव मदत कधी मिळणार? योग्य वेळ येताच आम्ही लाडक्या बहिणींना २१०० रुपयांचा लाभ नक्की देऊ.असे एकनाथ शिंदे म्हणाले.



## राज्यात भीक मागण्यास बंदी येणार

**नागपूर । प्रतिनिधी**

**राज्यात आता लवकरच भीक मागण्यास बंदी घालण्यात येणार आहे. विधानसभेपाठोपाठ आता विधान परिषदेमध्येही महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध विधेयक मंजूर करण्यात आलं. परंतु सभागृहातील अनेक सदस्य असमाधानी असताना गोंधळाच्या स्थितीत हे विधेयक मंजूर करण्यात आलं. त्यामुळे तालिका सभापती नीलम गोऱ्हे, शिवसेनेच्या आमदार मनिषा कायंदे, राष्ट्रवादीचे अमोल मिटकरा यांच्यासह अनेकांनी नाराजी व्यक्त केली. विधान परिषदेत हे विधेयक मंजूर झाल्यानंतर आता सभापतींच्या दालनात शनिवारी बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे.**

राज्यात भीक मागण्यास प्रतिबंध घालणारे विधेयक हे गोंधळाच्या

▶▶ पान २ वर

# संभाजीनगर रेल्वे विभागाला स्वतंत्र दर्जा द्या

## संभाजीनगर पैठण बीड सोलापूर या नव्या रेल्वेमार्गाला मंजुरीची कराड यांची मागणी

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

राज्यसभेतछत्रपती संभाजीनगर रेल्वेला स्वतंत्र विभागाचा दर्जा देण्याची जोरदार मागणी केली. यासोबतच संभाजीनगर पैठण बीड सोलापूर या नव्या रेल्वे मार्गाला त्वरित मंजुरी देण्यात यावी अशी मागणी भाजपाचे राज्यसभेचे खासदार डॉक्टर भागवत कराड यांनी आज सभागृहामध्ये केली. मागणीच्या उत्तरात रेल्वेमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

मराठवाडा प्रदेशात रेल्वे पायाभूत सुविधांचा जलद विकास, नवीन मार्गांची गरज आणि औद्योगिक आणि पर्यटन क्षेत्रांचा विस्तार पाहता केंद्र सरकारने या विषयावर त्वरित निर्णय घ्यावा, असे त्यांनी सांगितले.खा डॉ. कराड म्हणाले की, छत्रपती संभाजीनगर ही महाराष्ट्राची पर्यटन राजधानी मानली जाते. अजिंठा–वेरूळ लेणी, कैलास मंदिर, देवगिरी किल्ला,

▶▶ पान २ वर

# शिंदे सेनेच्या माजीमंत्री पुत्राची भाजपकडून उमेदवारीची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरात महानगरपालिका निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने इच्छुकांसाठी उमेदवारी अर्ज मागितले आहेत. गेल्या तीन दिवसांपासून भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात जवळपास २२०० हून अधिक इच्छुक उमेदवारांनी अर्ज दाखल केल्याची माहिती आहे. यामध्ये



एक धक्कादायक नाव समोर आलं आहे, ते म्हणजे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे माजी मंत्री तानाजी सावंत यांचे पुत्र गिरीराज सावंत यांनी देखील भाजपच्या इच्छुकांच्या यादीमध्ये आपला अर्ज दाखल केल्याची माहिती मिळत आहे .

भाजप कार्यालयात केशव उपाध्ये यांची पत्रकार परिषद होती. ही पत्रकार परिषद झाल्यानंतर भाजपच्या शहर कार्यालय बाहेर तानाजी सावंत यांच्या जे.एस.पी.एम संस्थेची एक कार अचानक आली आणि त्यामध्ये सावंत यांच्या संस्थेतीलच काही कर्मचारी होते आणि त्यांच्या हातात होता तो तानाजी सावंत यांचे पुत्र गिरीराज सावंत

▶▶ पान २ वर

## ममता बॅनर्जींनी केंद्राच्या आदेशाचा कागद फाडला

**कोलकाता । वृत्तसंस्था**

पश्चिम बंगालमध्ये पुढील वर्षी विधानसभा निवडणुका होणार आहेत. पण त्याभोवतीचे राजकीय वातावरण आतापासूनच तणावपूर्ण होत चालले आहे. सरकारी योजनांच्या अंमलबजावणीवरून केंद्र आणि राज्य सरकारमध्ये नवा तणाव निर्माण झाल्याचे चित्र आहे. हा नवा वाद हा केंद्र सरकारने बंगालमध्ये मनरेगा योजना तात्काळ लागू करण्याच्या आदेशाशी संबंधित आहे. या निर्णयाचा ममता बॅनर्जी सरकार विरोध करत आहे.

▶▶ पान २ वर

## पार्थ पवारच्या अडचणी वाढणार मुख्यमंत्री फडणवीसांचे मोठे विधान

**नागपूर । प्रतिनिधी**

मुंढवा जमीन प्रकरणात सरकार कुणालाही वाचवणार नाही. जो कोणी दोषी असेल, त्याच्यावर कायद्याच्या चौकटीत कठोर कारवाई होणार आहे. या प्रकरणात आतापर्यंत करण्यात आलेली कारवाई आणि पुढील टप्प्यात होणाऱ्या कारवाईची सविस्तर माहिती उच्च न्यायालयास सादर केली जाईल, असे स्पष्ट विधान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना केले.

मुंबई उच्च न्यायालयाने पार्थ पवारांवर अद्याप एफआयआर का दाखल झाला नाही, असा सवाल उपस्थित केल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांना विचारणा करण्यात आली. त्यावर ते म्हणाले की, न्यायालयाने नेमके काय निरीक्षण नोंदवले आहे, याची सविस्तर माहिती सादर करताना शासन

▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०५ डिसेंबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५८.०० क्विंटल | २,३९० | ३,१४० | २,७९४ |
| ज्वारी/हायब्रिड : ३८.५० क्विंटल | १,९२१ | ३,११० | २,७०२ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | १,६२६ | १,६२६ | १,६२६ |
| तूर : ३.५० क्विंटल | ६,४०० | ६,४०० | ६,४०० |
| उडीद :१८.०० क्विंटल | ३,५०० | ५,१६० | ४,६१५ |
| बाजरी: १४.५० क्विंटल | २,७०२ | ५,५२१ | ३,२५४ |
| मुग: १.५० क्विंटल | ५,५०० | ५,८५० | ५,६७५ |
| सोयाबीन: १७५.५० क्विंटल | ३,६०० | ४,५५० | ४,३६४ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ५,२०० | ५,२०० | ५,२०० |

# मुख्यमंत्री फडणवीसांना 'आशिकी' ची भुरळ!



**नागपूर । प्रतिनिधी**

**हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने आमदार, नेते सध्या नागपुरात मुक्कामी आहेत. अधिवेशन संपल्यानंतर काहीसा विरंगुळा व्हावा, म्हणून भाजपचे आमदार मंगलप्रसाद लोढा यांनी मंगळवारी रात्री हुरडा पार्टीचे आयोजन केले होते. विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही हुरडा पार्टी गाजवली.ती एका संगीत मैफिलीत त्यांनी आशिकी या चित्रपटातील गाण्याची फर्माईश केली आणि एकाच हश्या पिकाला कुमार सानू यांचा आवाज चांगला असल्याचे मुख्यमंत्री हसत हसत म्हणाले.**

हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने सलग दुस–यांदा मंगलप्रसाद लोढा यांनी ही हुरडा पार्टी आयोजित केली होती. या पार्टीला सर्वपक्षीय आमदार, नेत्यांना लोढांनी निमंत्रण दिले होते. विविध पक्षांतील आमदार, मंत्री आणि नेते या पार्टीला उपस्थित होते. पक्षीय राजकारण बाजूला ठेवून सर्वपक्षीय नेत्यांनी सुरात–सूर मिसळले. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी यावेळी व्यासपीठावर 'एक दिन मिट जायेगा माटी के मोल' हे गाणे म्हटले. त्यांनी उपस्थित आमदार, नेत्यांची मने जिंकली. नार्वेकरांचे गाणे संपल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गायक कुमार सानू यांच्या गाण्याची फर्माईश केली. 'आशिकी' चित्रपटातील गाण्याची फर्माईश

▶▶ पान २ वर

# ई–वाहनधारकांकडून पैसे घेऊ नका

## टोलवसुली बाबद अध्यक्षांचा सरकारला अल्टिमेटम

**नागपूर। प्रतिनिधी**

राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात विविध प्रश्नांवरून वातावरण तापत असताना आज विधानसभा अध्यक्षांनी सरकारला महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. राज्यातील इलेक्ट्रिक वाहनधारकांकडून टोलची सुरू असलेली बेकायदेशीर वसुली थांबवण्यासाठी महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी बुधवारी सरकारला कडक निर्देश दिले. टोलमाफीसंदर्भातील शासन निर्णय लागू असूनही टोल आकारणी सुरू असल्याचे निदर्शनास आल्यानंतर, 'पुढील आठ दिवसांत एकाही ई–वाहनधारकाकडून टोल आकारला जाता कामा नये',

▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# वंदे मातरम परिमाण नाही ; वास्तव स्वीकारावे लागेल !

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्फूर्तीदायक गीत असलेल्या 'वंदे मातरम्' या रचनेला दीडशे वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने भारतीय संसदेत विशेष चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चेदरम्यान सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी विशेषतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'वंदे मातरम्' गीताला समोर ठेवून विरोधी पक्षांना विशेषतः काँग्रेस पक्षाला लक्ष्य केले आणि वंदे मातरम्? राष्ट्रीयगीताच्या निमित्ताने वंदे राजकारणम्चे दर्शन घडवले.

ज्या मंत्राने स्वातंत्र्यलढ्याला प्रेरणा दिली आणि त्या तपस्येचा मार्ग दाखवला त्या वंदे मातरम्चे पुण्यस्मरण करणे सर्वांचे सौभाग्य आहे, अशा शब्दात पंतप्रधान मोदींनी चर्चेला प्रारंभ केला असला, तरी आपल्या भाषणामध्ये त्यांनी काँग्रेसलाच लक्ष्य करून या निमित्ताने पुन्हा एकदा देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्यावरही टीका केली. देशातील अल्पसंख्याक समाज नाराज होईल म्हणून काँग्रेसने वंदे मातरम्बाबत तडजोड करत त्याचे तुकडे केले आणि या निर्णयाला सामाजिक सलोख्याचे आवरण घातले, वस्तुस्थिती अशी आहे की काँग्रेसने मुस्लीम लीगसमोर गुडघे टेकले.

या तुष्टीकरणाच्या धोरणामुळेच नंतर देशाच्या फाळणीसाठीही झुकावे लागले, असा खळबळजनक आरोप नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणामध्ये केला. खरे तर वंदे मातरम्? सारख्या प्रेरणादायक राष्ट्रीय गीतावर विशेष चर्चा आयोजित केली असताना त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे राजकारण न आणता या राष्ट्रीयगीताने स्वातंत्र्यलढ्याला कशी प्रेरणा दिली आणि आजही दीडशे वर्षानंतर हे गीत कसे प्रेरणादायी ठरत आहे हे सांगणे गरजेचे असताना नरेंद्र मोदी आणि त्यांच्या सर्वच सहकाऱ्यानी काँग्रेसला लक्ष्य करण्याचे एक कलमी धोरण अवलंबलेले दिसले. याबाबत जी वस्तुस्थिती नंतर काही समाजतज्ज्ञांनी समोर आणली ती पाहता वंदे मातरम्चे जे तुकडे करण्याचा आरोप केला जातो त्यामध्ये पुढाकार भाजपाला वंदनीय असलेल्या वल्लभभाई पटेल यांनीच घेतला होता. वल्लभभाई पटेल, सुभाषचंद्र बोस अशा काही नेत्यांनीच तसा प्रस्ताव मांडला होता आणि वंदे मातरम्? संक्षिप्त स्वरूपात समोर आणण्यात आले होते, असा दावा काही तज्ज्ञांनी केला आहे. अर्थात, काँग्रेसवर या संसदेच्या सभागृहात टीका होत असताना त्याबाबतीत कोणताही बचाव काँग्रेस नेत्यांना करता आला नाही. पण संसदेबाहेर मात्र अनेक नेत्यांनी तशा प्रकारचा बचाव करून नरेंद्र मोदी यांच्या भाषणातील फोलपणा उघड केला.

काँग्रेसच्या नेत्या प्रियंका गांधी यांनी मात्र अशा प्रकारच्या चर्चेची कोणतीही गरज नव्हती, पश्चिम बंगालची निवडणूक डोळ्यासमोर ठेवूनच जाणीवपूर्वक ही चर्चा घडवण्यात आल्याचा आरोप केला. त्यात काही प्रमाणात तथ्यही आहे. कारण भारतीय जनता पक्ष हा देशातील एकमेव पक्ष आहे जो २४ तास निवडणूक मोडमध्येच असतो. त्यांचा कोणताही निर्णय आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवूनच असतो. वंदे मातरम्? या राष्ट्रीयगीताला पश्चिम बंगालची मोठी पार्श्वभूमी असल्यामुळेच या विषयावर जाणीवपूर्वक चर्चा करण्याचा निर्णय घेण्यात आला हे उघड आहे. भारतीय जनता पक्षाचे म्हणजे सत्ताधारी पक्षाचे हे राजकारण विरोधी पक्षांच्या उशिरा लक्षात आले. संसदेच्या व्यासपीठावर या राजकारणाचा पर्दाफाश करणे विरोधी पक्षांना शक्य होते. पण ही चर्चा जास्त गांभीर्याने घेतली नाही. आणि ज्यांनी ज्यांनी मोदींचे वक्तव्य खोडून काढले त्यांना माध्यमांनी प्रसिद्धी न देता नेहमीप्रमाणे नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर आणि जवाहरलाल नेहरू यांच्यावर केलेल्या टीकेलाच प्राधान्य दिले. त्यानिमित्ताने सत्ताधारी भारतीय जनता पक्षासाठी राजकारण किती महत्त्वाचे हे आहे हे पुन्हा एकदा दिसून झाले. गेल्या काही वर्षांमध्ये जाणीवपूर्वक पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून जवाहरलाल नेहरू आणि त्यांच्या निर्णयाबाबत शंका उपस्थित करून गेल्या ७० वर्षांमध्ये काँग्रेसच्या राजवटीत काहीच झाले नाही हे दाखवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

अशी कोणतीही संधी मिळाली तर नरेंद्र मोदी यांची राजवट आणि पूर्वीच्या राजवटी यांची तुलना करून आत्ताचे सरकार कसे जास्त सक्षम आणि बळकट आहे हे दाखवण्याचा प्रयत्न केला जातो. संसदेत किंवा संसदे बाहेर जेव्हा अशा प्रकारची रणनीती भारतीय जनता पक्षाकडून आखली जाते तेव्हा विरोधी पक्षांकडून विशेषतः काँग्रेसकडून त्याला मुहतोड जबाब देण्याची कोणतीही रणनीती आखली जात नाही. केवळ नरेंद्र मोदी यांच्या अशा कोणत्या भाषणांचा निषेध करून काही साध्य होणार नाही, तर मोदी यांनी उपस्थित केलेल्या प्रत्येक मुद्द्याला ठोस उत्तर देणे गरजेचे आहे हे अद्याप काँग्रेस नेत्यांच्या लक्षात आलेले नाही.

वंदे मातरम्? या गीताला दीडशे वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आगामी कालावधीमध्येसुद्धा देशात ठीकठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल आणि या निमित्ताने सत्ताधारी पक्ष किती बळकट आणि सक्षम आहे हेच दाखवण्याचा प्रयत्न केला जाईल. काँग्रेसच्या तुष्टीकरणाच्या धोरणामुळेच देशाला फाळणीला सामोरे जावे लागले हा विषय जो नरेंद्र मोदी यांनी प्राधान्याने समोर आणला आहे, तो विषयसुद्धा सातत्याने मांडला जाईल. त्याला ठोस उत्तर देण्याचे काम आगामी काळामध्ये काँग्रेस नेत्यांना करावेच लागणार आहे.

# ११ लाख डुप्लिकेट मतदारांपैकी आतापर्यंत फक्त अडीच लाख मतदारांची ओळख पटली

## अजून ८,७६,४३७ मतदारांची ओळख पटवणे बाकी

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोगाने (एसईसी) आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी चुका दुरुस्त करण्यासाठी आणि प्रारूप मतदार यादी प्रकाशित करण्यासाठी तिसऱ्यांदा तारीख वाढवली आहे. सुरुवातीला २७ नोव्हेंबर रोजी नियोजित यादी ५ डिसेंबर, नंतर १० डिसेंबर आणि आता १५ डिसेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. बीएमसीसह अनेक महानगरपालिकांनी मुदतवाढ मागितली असल्याने निवडणूक आयोगाचा ताण स्पष्ट आहे. मसुदा मतदार यादीतील सर्वात मोठे आव्हान म्हणजे डुप्लिकेट मतदारांचा प्रश्न. निवडणूक आयोगाने बीएमसीला सादर केलेल्या यादीमध्ये ११ लाख ५०५ डुप्लिकेट मतदार आहेत. हे लक्षात घेण्यासारखे आहे. यापैकी, बीएमसी आतापर्यंत फक्त अडीच लाख मतदार ओळख पटली आहे, म्हणजेच ८,७६,४३७ मतदारांची ओळख पटवणे बाकी आहे. घड्याळ काटे पुढे सरकत आहे तसे बीएमसी कर्मचाऱ्यांवरील भार वाढत आहे.

बुधवारी पत्रकारांशी बोलताना बीएमसीच्या अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी यांनी सांगितले की, बीएमसीच्या ए ते पी वॉर्डमध्ये ज्या मतदारांची नावे एकापेक्षा जास्त वेळा येतात त्यांची संख्या २ लाख २५ हजार आहे, त्यापैकी फक्त ४१,०५७ डुप्लिकेट मतदार आहेत. आणि उर्वरित मतदारांची नावे एकच आहेत. परिणामी, उर्वरित ८ लाखाहून अधिक मतदारांची पुढील काही दिवसांत ओळख पटवण्यात येणार आहे. याबाबत डुप्लिकेट मतदार ओळखण्याचे काम आव्हानात्मक आहे. विविध वॉर्डांचा समावेश असलेल्या प्रारूप मतदार यादीवर एकूण ११,४९७ हरकती आणि सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी १०,६६८ प्रकरणे सोडवण्यात आली आहेत. यापैकी ८२९ हरकती डुप्लिकेट मतदारांशी संबंधित होत्या. असेही बीएमसी सूत्राकडून सांगण्यात आले आहे. सर्व २६ प्रशासकीय विभागांमध्ये प्राप्त झालेल्या हरकती आणि सूचनांचे निवारण करण्यासाठी संबंधित प्रभागांच्या सहाय्यक आयुक्तांची अधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. प्रारूप मतदार यादीवर निर्णय झाल्यानंतर, अंतिम मतदार यादी विचारात घेऊन ''कंट्रोल चार्ट'' तयार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ज्या प्रभागांमध्ये एका प्रभागातून दुसऱ्या प्रभागात १०० पेक्षा जास्त मतदारांची नोंदणी झाली आहे, तेथे विभागीय सहाय्यक आयुक्त आणि उपायुक्तांना गुगल मॅप्सवर स्थापित प्रभाग सीमांनुसार घरे, इमारती, चाळी किंवा वस्त्यांचे तात्काळ प्रत्यक्ष निरीक्षण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संबंधित प्रमाणपत्रे आणि छायाचित्रे सादर करणे देखील आवश्यक असेल असेही अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी यांनी पत्रकाराचे बोलताना सांगितले. दरम्यान, डुप्लिकेट नावे निश्चित करण्यासाठी घरोघरी जाऊन पडताळणी प्रक्रिया अवलंबली जाईल. यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) आणि निवडणूक कामात सहभागी असलेल्या विभागीय कर्मचाऱ्यांची जबाबदारी सोपवण्यात आली असल्याचे जोशी म्हणाल्या. यावेळी सहआयुक्त (कर निर्धारण आणि संकलन) विश्वास शंकरवार आणि सहाय्यक आयुक्त डॉ. गजानन बेल्लाले हे देखील उपस्थित होते. बीएमसीने नागरिकांना निवडणूक प्रक्रियेत सहकार्य करण्याचे आणि पडताळणीच्या कामासाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना आवश्यक माहिती देण्याचे आवाहन केले. डुप्लिकेट नावे निश्चित करण्यासाठी घरोघरी जाऊन पडताळणी प्रक्रिया अवलंबली जाईल. यासाठी, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) आणि निवडणुकीच्या कामात सहभागी असलेल्या विभागीय कर्मचाऱ्यांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. जर मतदार घरी उपलब्ध नसेल तर त्यांच्या निवासस्थानी एक नोटीस लावली जाईल ज्यामध्ये त्यांना प्रभाग कार्यालयाशी संपर्क साधण्याची विनंती केली जाईल.

# बीड जिल्ह्यातील तीन खत विक्री करणाऱ्या कृषी केंद्रावर गुन्हे दाखल

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी सुभाष साळवे, आशीष काळूसे, तंत्र अधिकारी गु. नि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय भरारी पथक प्रमुख साहिल सय्यद, कृषी विकास अधिकारी जिल्हा परीषद सायप्पा गरांडे मोहीम अधिकारी जिल्हा परीषद वल्लभ भोसले जिल्हा गुण नियंत्रण निरिक्षक यांच्या उपस्थितीत गणेश हिरे खत निरिक्षक तथा कृषी अधिकारी (गु.नि.) गेवराई यांनी भोगस खत विक्री करणारे काव्या अग्रो चे प्रतिनिधी राधेशाम काकडे व खत पुरवठा करणारी कंपनी विदूत अग्रो केम प्रा. लि. रायगड चे संचालक निखील कासोळे यांच्या विरूद गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.**

मिळालेल्या गुप्त माहितिच्या आधारे काल दिनांक ८ डिंसेबर २०२५ रोजी भरारी पथकाने काव्या आग्रो मोंढा रोड गेवरा जिल्हा बीड येथे तपासणी केली असता सदरील ठिकाणी मिश्र खताचे ग्रेड एनपीके १०:२०:२० व २०: २०: ००. पुढील मजकुराचे एकुन ५५ बॅग (प्रति बॅग ५० किलो) असल्याचे आढळून आले. १) खताचे नाव - १०:२०:२० (दाणेदार मिझ्रू खत)-३७ बॅग आणि एनपीके-२०:२०:०० (दाणेदार मिश्र खत)-१८ बॅग २) उत्पादकाचे नाव - मे. शिवाजी ऍग्रो पिके जालना ३) खताचा ब्रँड - जय किसान ४) मार्केटिंगचे नावः विद्युत ऍग्रो केम. . सेकंद १८ एसएनओ-६. नवीन पनवेल रायगड -४१०२०६. याबाबत काव्या आग्रो यांना खताचे खरेदी बिले मागितले असता त्यांच्या कडे बिल नसले बाबत सांगितले. त्यानंतर संबंधित उत्पादक शिवाजी ॲग्रो क्रॉप जालनाचे प्रतिनिधी भागीरथी के. यांना भ्रमणध्वनीद्वारे विचारणा केली असता. त्यांनी सांगीतले की शिवाजी ॲग्रो क्रॉप सायन्स जालना चा परवाना करार रदद करनेबाबत दि.४/०२/२०२५ रोजी मा. कृषि संचालक (नि.गुनि.)यांना प्रस्ताव सादर केला आहे. त्यानंतर कंपनीने कोणत्याही प्रकारचे उत्पादन व पुरवठा केला नाही. याबाबत वितरक कंपनीचे संचालक निखिल कासोळे यांना भ्रमणध्वनीद्वारे कृषि केंद्र चालक प्रतिनिधी राधेशाम काकडे यांनी विक्री केंद्रात बोलावून घेतले. निखिल कासोळे यांना सदरील खत कृषि गौरव फर्टिलायझर ता.नेवासा,जि.अहमदनगर यांचेकडून सिलीकॉन खत या नावाने खरेदी करून ते खत १०:२०:२० व २०:२०:०० या खताच्या बॅग भरून मे. काव्या ॲग्रो गेवराई यांना दुकानदारास दिले याबाबत लेखी खुलासा दिला. यानिमित्ताने जिल्ह्यात कुठेही विना परवाना, अनधिकृत कृषी निविष्ठा विक्री होत असल्यास जवळच्या कृषी कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

# लोकनेते मुंडे साहेबांना अभिवादन करण्यासाठी १२ डिसेंबरला गोपीनाथ गडावर उसळणार अलोट गर्दी

**परळी वै.। प्रतिनिधी**

**लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी १२ डिसेंबर रोजी गोपीनाथ गडावर राज्याच्या कानाकोपऱ्यातून मोठी गर्दी उसळणार आहे. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यावेळी उपस्थित राहणार आहेत.**

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांना अभिप्रेत असलेल्या सामाजिक उपक्रम आयोजित करून आपण ज्या ठिकाणी आहात त्याच ठिकाणी मुंडे साहेबांची जयंती साजरी करावी असे आवाहन ना. पंकजाताई मुंडे यांनी केले आहे. ना. पंकजाताई मुंडे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून राज्यभरातील कार्यकर्त्यांना आवाहन केले आहे. १२ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता गोपीनाथगड येथे आपण उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. गेल्या वर्षीपासून आपण आहे त्या ठिकाणी मुंडे साहेबांना अभिप्रेत असलेल्या जनसेवेच्या विविध उपक्रमांनी त्यांची जयंती साजरी करावी असे आवाहन केले होते. त्या अनुषंगाने गेल्या वर्षी गावागावांमध्ये अशा पद्धतीने उत्साहात मुंडे साहेबांची जयंती साजरी झाली. याही वर्षी त्याच पद्धतीने गरजूंना मदत करून सामाजिक दायित्व घेऊन जयंती साजरी करावी. गेल्या दशकभरात आपण भव्य दिव्य कार्यक्रम केले मात्र मागच्या वर्षीपासून आपण ज्यांनी त्यांनी आपापल्या गावी मुंडे साहेबांच्या स्मरणार्थ मुंडे साहेबांना अभिप्रेत अशा पद्धतीने सामाजिक न्यायाचे कार्यक्रम आयोजित करावेत असे आवाहन केले.

### » गरजूंना मदत करण्याचे आवाहन

यावर्षीही मुंडे साहेबांच्या जीवनाला शोभेल अशा पद्धतीची कामे करावीत, शेतकऱ्यांचे, विद्यार्थ्यांचे, गरजूचे, आजारी व्यक्ती अशा सर्व व्यक्तींना मदत होईल अशा पद्धतीचे उपक्रम आपण घ्यावेत आणि मुंडे साहेबांची जयंती सामाजिक उपक्रमांनी साजरी करा असे आवाहन ना. पंकजाताई मुंडे यांनी केले आहे.

# जालण्यातील लॉजवर चालणारा वेश्या व्यवसायाचा पोलिसाकडून भांडाफोड

**जालना । प्रतिनिधी**

**जालना बस स्थानक जवळ एका लाजवर सुरू असलेला वेशाच्या अड्ड्यावर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक विभागाची धडाकेबाज कारवाई**

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षास गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर बातमी मिळाली की बसस्टॅन्ड रोड वरील न्यु शिवगंगा लॉज येथे लॉज मालक हे स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी त्यांच्या न्यु शिवगंगा लॉजमधे बाहेरुन महीलांना आणुन त्यांच्याकडुन वेश्या व्यवसाय करीत आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाल्या वरुन सदर माहीती बाबत मा. पोलीस अधिक्षक यांच्याशी चर्चा करुन त्यांच्या सुचनेप्रमाणे स्वागुशाचे पोनि.श्री. पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाचे प्रभारी अधिकारी व स्टाफचे अंमलदार यांनी मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी छापा टाकला असता, न्यू शिवगंगा लॉज येथे आरोपी नामे १) न्यु शिवगंगा लॉजचे मालक २) मॅनेजर बाळासाहेव अंकुश जगताप वय ३२ वर्ष रा. घोटन




ता. बदनापुर जि. जालना ३) निखील हिवाळे खासगाव ता. जाफ्राबाद जि. जालना ४) राजु नाना रा. सिंदखेड राजा जि. बुलढाणा ५) अनिल हिवाळे रा. कुंभारी ता. जाफ्राबाद जि. जालना ६) गणेश ओळेकर रा. तळनी ता. बदनापुर जि. जालना ७) शिवाजी ओळेकर रा. तळनी ता. बदनापुर जि. जालना ८) अमोल जंजाळ रा. कुंभारी ता. जाफ्राबाद जि. जालना असे ०४ पीडीत महीलांसह मिळुन आले असुन त्यांच्या ताब्यात रोख १०१,२७०/-असा मुद्देमाल मिळून आला आहे. त्यानुसार त्यांना ताब्यात घेवुन त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे सदरबाजार येथे महीलांच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध अधिनियम १९५६ कलम ३,४,५,६ प्रमाणे प्रभारी अधिकारी अ.मा.वा.प्र. कक्ष पोउपनि गणेश शिंदे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी जालना श्री अनंत कुलकर्णी, पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव (स्थागुशा) यांच्या मार्गदर्शनाखाली अ.मा.वा.प्र. कक्षाचे प्रभारी अधिकारी पोउपनि गणेश शिंदे, पोउपनि रवी जोशी, पोहेकों कृष्णा देठे, महिला अंमलदार संगिता चव्हाण, पुष्पा खरटमल, आरती साबळे, रेणुका राठोड व चालक पोलीस अंमलदार संजय कुलकर्णी यांनी केलेली आहे.

## पान १ वरून...

### १२९ कारखान्यांकडे २ हजार कोटींची

सरकार, साखर संघ तसेच राज्यातील साखर कारखान्यांनी उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती देण्याची मागणी केली होती. पण सर्वोच्च न्यायालयाने त्याला स्थगिती दिलेली नाही. यावर पुढील आठवड्यात तातडीची सुनावणी ठेवण्यात आली आहे. राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून साखर कारखान्यांना पाठीशी घालण्याचे काम केले आहे. यामुळे राज्यातील साखर कारखाने एफआरपी देण्यास टाळाटाळ करत असल्याचा शेट्टी यांचा आरोप आहे. विशेषत: मराठवाडा, विदर्भासह सोलापूर आणि पुणे जिल्ह्यातील कारखान्यांची थकीत एफआरपीची रक्कम अधिक आहे. तर स्वाभिमानीच्या रेट्यामुळे सांगली आणि कोल्हापूर ऊस पट्ट्यातील कारखान्यांनी एकरकमी एफआरपीची बिले दिलेली असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. साखर आयुक्तांनी थकित एफआरपी प्रश्नी १२९ कारखान्यांवर तातडीने कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा स्वाभिमानीकडून तीव्र आंदोलन केले जाईल, अशा इशारा शेट्टी यांनी दिला आहे.

---------------

### लाडक्या बहिणीवरून विधानसभेत

लावण्यात आले. त्यांना टार्गेट देण्यात आले. अमुक-अमुक फॉर्म भरून झालेच पाहिजेत, असे त्यांना सांगण्यात आले. त्यानंतर या कर्मचा-यांनी अनेक ठिकाणी बोगस फॉर्म भरले आहेत. या योजनेत मोठी गडबड झालेली आहे. या गडबडीला कोण जबाबदार? जनतेच्या पैशांचा हिशेब द्यावा लागेल, असा जाब काँग्रेसचे आमदार नाना पटोले यांनी विचारला. विरोधकांना प्रत्युत्तर देताना महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे म्हणाल्या, ज्या पुरुषांच्या बँक खात्यांवर पैसे जमा झाले ती खाती तपासली जातील. या योजनेचा फायदा खरंच पुरुष घेत असतील तर नक्कीच कारवाई होईल, असे आश्वासन अदिती तटकरे यांनी दिले. केवायसीसाठी आता १३ कंडिशन टाकल्या आहेत. याआधी त्या नव्हत्या, असे जयंत पाटील यांनी पुन्हा सभागृहात नमूद केले. तर अनेक महिलांचे बँकेत खाते नाही. त्यामुळे त्या महिलांनी या पैशांसाठी घरातील कर्त्या पुरुषाचे खाते दिले आहे. यासाठीच केवायसी आपण केली अशी माहिती अदिती तटकरेंनी जयंत पाटील यांच्या आरोपावर उत्तर देताना सभागृहात दिली.

---------------

### राज्यात भीक मागण्यास

स्थितीत विधान परिषदेत मंजूर करण्यात आलं. राज्याच्या मंत्री अदिती तटकरेंनी हे विधेयक मांडलं. त्यावर आमदार मनीषा कायंदे, अमोल मिटकरी आणि तालिका सभापती निलम गोर्हे यांनी असमाधान व्यक्त केलं. महारोगी शब्द वगळण्यासाठी आलेल्या विधेयकाचा आणि त्याचे शीर्षक यात ताळमेळ नसल्याची प्रतिक्रिया आमदार एकनाथ खडसेंनी दिली. तर, विधेयकाबाबत माहिती दिलेल्या पुस्तिकेतील स्पष्टीकरणावर तालिका सभापती नीलम गोऱ्हेंनी असमाधान व्यक्त केले.सभागृहातील अनेक सदस्य असमाधानी असतानाही विधेयक मंजूर करण्यात आलं. या संबंधित विधान परिषद सभापतींच्या दालनात शनिवारी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे

-------------

### शिंदे सेनेच्या माजीमंत्री पुत्राची

यांचा उमेदवारी अर्ज. काही वेळातच या कर्मचाऱ्यांनी गिरीराज सावंत यांचा उमेदवारी अर्ज भाजपच्या कार्यालयात दाखल केला आणि ते तिथून निघून गेले. याबाबत आमचे प्रतिनिधी यांनी गिरीराज सावंत यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी 'शिवसेना हा आमचा पक्ष आहे. आमच्या घरात आमदार आहेत त्यामुळे भारतीय जनता पक्षाची उमेदवारी स्विकारण्याचा किंवा घेण्याचा संबंध येत नसल्याचं' म्हटलं आहे. दरम्यान, जरी गिरीराज सावंत यांनी या चर्चेमध्ये तथ्य नसल्याचं म्हटलं असलं तरी खात्रीलायक सूत्रांनुसार पुण्यातील प्रभाग क्रमांक ३८ मधून गिरीराज सावंत यांनी अर्ज भरला आहे. आता गिरीराज सावंत यांनी खरंच भाजकडून अर्ज भरला आहे की नाही? हे पाहणं तेवढंच महत्त्वाचं आहे.

--------------

### संभाजीनगर रेल्वे विभागाला

पंचखडी आणि बीबी का मकबरा यासह जगप्रसिद्ध ऐतिहासिक वारसा स्थळांमुळे दरवर्षी लाखो पर्यटक या प्रदेशाला भेट देतात. याव्यतिरिक्त, दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर अंतर्गत शेंद्रा-बिडकीन परिसरात अंदाजे ₹१ लाख कोटींची औद्योगिक गुंतवणूक सुरू आहे. या परिस्थितीमुळे प्रगत रेल्वे सुविधांची गरज आणखी वाढते.खा डॉ. कराड यांनी सांगितले की, सध्याची वंदे भारत एक्सप्रेस (छत्तीसगड संभाजीनगर नांदेड) विस्तारित स्वरूपात कार्यरत आहे. त्यामुळे छत्रपती संभाजीनगर आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) दरम्यान एक नवीन वंदे भारत ट्रेन सुरू करावी. त्यांनी स्पष्ट केले की, छत्रपती संभाजीनगरमधील पिट लाईन आणि सिक लाईनचे काम पूर्ण झाले आहे. त्यांनी छत्रपती संभाजीनगरला उत्तर भारताशी जोडणाऱ्या प्रस्तावित संभाजीनगर-कन्नड-चाळीसगाव रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षणावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले.संभाजीनगर-पैठण-बीड-सोलापूर या महत्त्वाच्या मार्गाला त्वरित मंजुरी देण्याची मागणीही त्यांनी केली. संभाजीनगर-अहिल्यानगर-पुणे हा मार्ग उत्तर आणि दक्षिण भारताला जोडणारा एक महत्त्वाचा औद्योगिक मार्ग आहे आणि या मार्गाचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे, अशी माहितीही त्यांनी दिली. शेवटी, खासदार डॉ. भागवत कराड यांनी वरील सर्व मागण्या मान्य करून केंद्र सरकार मराठवाडा प्रदेशात रेल्वे सुविधांच्या विकासाला गती देईल अशी आशा व्यक्त केली.

------------

### पार्थ पवारच्या अडचणी वाढणार

न्यायालयाला योग्य उत्तर देईल. सरकारची भूमिका पहिल्या दिवसापासून स्पष्ट आहे. दोषी कुणीही असो, त्याच्यावर कारवाई अटळ आहे. कोणालाही संरक्षण दिले जाणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुतीत मतभेद असल्याच्या चर्चांवरही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्टीकरण दिले. ते म्हणाले, ''महापालिका निवडणुकांच्या संदर्भात आम्ही पूर्णपणे एकत्र आहोत आणि एकत्रितच लढणार आहोत. आमच्यात कोणताही राडा किंवा रोडा नाही.'' एकनाथ शिंदे यांच्याशी असलेल्या संबंधांबद्दल बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, ''एकनाथ शिंदे नेहमीच माझे कौतुक करतात आणि मीही त्यांचे कौतुक करतो. आम्ही दिलखुलास मित्र आहोत.''

-------------

### ममता बॅनर्जींनी केंद्रच्या

तसेच, ममता यांनी रागाच्या भरात यासंदर्भातील एक प्रतही फाडून टाकली. केंद्र सरकारनेपश्चिम बंगालमध्ये मनरेगा योजना स्थगित गेली होती. पण आता जवळपास तीन वर्षांनी काही अटी आणि कायदेविषयक उपाययोजना लागू करून बी योजना तात्काळ प्रभावाने सुरु करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सूत्रांचे म्हणणे आहे की, कोलकाता उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाने ६ डिसेंबर रोजी मनरेगाच्या अंमलबजावणीबाबत एक आदेश जारी केला, ज्यामध्ये म्हटले आहे की, ग्रामीण विकास विभाग पश्चिम बंगालमध्ये महात्मा गांधी नरेगा तात्काळ प्रभावाने पुन्हा लागू करत आहे. पश्चिम बंगाल सरकारलाही याची माहिती देण्यात आली. ममता बॅनर्जी यांचे राज्य सरकार या आदेशामुळे खूप नाराज आहे. ममता बॅनर्जी यांनी या मुद्द्यावरून केंद्र सरकारवर हल्लाबोल केला आणि कूचबिहारमधील एका जाहीर सभेत मनरेगाशी संबंधित नवीन नियम असलेली एक कागद फाडला. त्यांनी या योजनेला निरुपयोगी आणि अपमानजनक म्हटले. बंगालला दिल्लीकडून दान न घेता स्वत:ची योजना राबवता येऊ शकते, असेही त्या म्हणाल्या.

-------------

### ई-वाहनधारकांकडून

असा अल्टिमेटम नार्वेकर यांनी सरकारला दिला.प्रश्नोत्तर तासादरम्यान आमदार अनिल पाटील, शंकर जगताप, आणि राहुल कुल यांनी हा मुद्दा उपस्थित केला. महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२५ अंतर्गत मुंबई-पुणे एक्सप्रेसवे, समृद्धी महामार्ग आणि अटल सेतू (शिवडीनावा शेवा लिंक) या मार्गांवर प्रवासी ई-वाहनांसाठी संपूर्ण टोलमाफी जाहीर करण्यात आली होती. तरीही ऑगस्टपर्यंत अनेक टोल प्लाझांवर टोल आकारणी सुरूच असल्याची तक्रार आमदारांनी मांडली.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रश्नाला उत्तर देताना पूर्ण टोलमाफीचा निर्णय सरकारने घेतल्याचे सांगितले. त्यांनी स्पष्ट केलं की अटल सेतूसाठी २१ ऑगस्ट २०२५ आणि मुंबईपुणे एक्सप्रेसवे व समृद्धी महामार्गासाठी २२ ऑगस्ट २०२५ रोजी आवश्यक अधिसूचना काढण्यात आल्या. तरीही काही टोल नाक्यांकडून तत्काळ अंमलबजावणी न झाल्याचे त्यांनी मान्य केले.एकनाथ शिंदे यांनी पुढे बोलताना सांगितलं की, टोलसंबंधी निर्णयांची अंमलबजावणी एमएसआरडीसी आणि एमएमआरडीए करत असून अधिसूचना निघाल्यानंतर विलंबाचा प्रश्नच उद्भवत नाही. तथापि, प्रत्यक्षात अद्यापही टोल वसुली सुरू असल्याचे आमदारांनी ठामपणे सांगितले. यावर अध्यक्ष नार्वेकर यांनी हस्तक्षेप करत सरकारला तातडीने कार्यवाहीचे आदेश दिले. 'जीआर आलाय, मग अंमलबजावणी झालीच पाहिजे. कोणत्याही टोल नाक्यावर ई-वाहनधारकांकडून पैसे घेऊ नका,' असे त्यांनी स्पष्ट निर्देश दिले आहेत.

------------------

### मुख्यमंत्री फडणवीसांना 'आशिकी'ची भुरळ!

मुख्यमंत्र्यांनी केली. कार्यक्रमात नव्वदच्या दशकातील गाण्याची फर्माईश मुख्यमंत्र्यांनी केली.नागपूर येथे हिवाळी अधिवेशनाच्या अनुषंगाने सुयोग प्रांगण, सिव्हिल लाईन्स येथे आयोजित या 'हुरडा पार्टी' कार्यक्रमात राजकारणासोबत विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. एकमेकांशी संवाद साधत आणि पारंपरिक हुरड्याचा आस्वाद घेत पार्टीचा आनंद लुटला.आशिकी गाण्यावेळी अनेकांनी मुख्यमंत्र्यांना विनोदात खरच आशिकी मधील गाणी तुम्हाला अजूनही आवडतात का यावर कुमार सानू यांचा आवाज चांगला आहे आणि ते ऐकायला समाधान वाटते असे म्हणाले.

## थोडक्यात



### राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये जागतिक एड्स दिनानिमित्त रांगोळी व चित्रकला स्पर्धा उत्साहात

किल्ले धारूर । प्रतिनिधी

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना, रेड रिबन क्लब व सांस्कृतिक विभागाच्या वतीने वतीने जागतिक एड्स दिनानिमित्त रांगोळी व चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. या स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. रांगोळीच्या माध्यमातून एचआयव्ही आजार व त्याचे दुष्परिणाम यासंबंधी जागृती घडविण्यात आली. या स्पर्धेत प्रथम क्रमांक समीक्षा राजाभाऊ पवार, द्वितीय क्रमांक सुप्रिया राम मोरे, तृतीय क्रमांक वैष्णवी अशोक साळवे तसेच चित्रकला स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक अमन बेग, द्वितीय क्रमांक मोरे सुप्रिया राम, तृतीय क्रमांक चोले प्रियंका बळीराम या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत यश संपादन केले. त्यांच्या यशाबद्दल प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सर्व स्पर्धकांचे प्राचार्यांनी अभिनंदन केले. तसेच यावेळी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, प्रा. नागोराव वाघमारे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाधिकारी डॉ. विजयकुमार कुंभारे व कार्यक्रमाधिकारी प्रा. बालासाहेब जोगदंड व सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विनायक कापावार यांनी स्पर्धेचे यशस्वी आयोजन केले.

### बाबा आढाव कष्टकऱ्यांचा बुलंद आवाज होते -प्रा.सुशीला मोराळे

बीड । प्रतिनिधी



आपले पूर्ण आयुष्य कष्टकऱ्यांसाठी वेचण्याचे काम बाबांनी केले सामाजिक विषमतेविरुद्ध ते लढत राहिले खेड्यातील अस्पृशता कमी व्हावी म्हणून बाबांनी १९७२ ला एक गाव एक पाणवठा ही चळवळ सुरू केली कारण दलितांना पाणवठ्यावर पाणी पिऊ दिले जात नव्हते बाबा कर्मठ समाजवादी होते त्यांच्या जाण्यामुळे वंचित उपेक्षित माणसाचा आधारवड हरपला अशी प्रतिक्रिया ज्येष्ठ समाजवादी नेत्या प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी दिली आहे.

बाबांनी १४ महिने आणीबाणीत तुरुंगवास भोगला होता डॉ. बाबासाहेबांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला देण्यासाठीच्या लॉंग मार्चसह अनेक लढ्यात बाबा सक्रिय होते. रिक्षा चालकावरील होत असलेल्या अन्याया विरुद्ध बाबा उभे राहिले रिक्षा पंचायतीची स्थापना केली हमालावर होत असलेल्या अन्याय विरोधातही हमाल पंचायतची त्यांनी स्थापना केली त्यांना न्याय मिळवून दिला.

माथाडी कायद्यात बदल करायला भाग पाडले.

पुण्यात काच कागद भंगार गोळा करणाऱ्या हजारो महिलांना संघटित केले त्यांच्यावरही खोट्या गुन्ह्या विरोधात आवाज उठवला. बाबा कट्टर फुलेवादी होते त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमात ते सत्याचा अखंड गायचे बीड ला ते एक गाव एक पाणवटा कार्यक्रमाला यायचे, खळवट लिंबगाव तालुका माजलगाव येथे येऊन त्यांनी हा कार्यक्रम युक्रांद चे जनार्दन तुपे पँथरचे शाम तांगडे मी स्वतः सर्वांना एकत्र करून यशस्वी केला होता त्यांच्या जाण्यामुळे समाजवादी विचार जोपासणारा कार्यकर्ता गेल्याची खंत आहे. ही पोकळी भरून निघणे अवघड आहे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली..

# जिल्हाधिकारी साहेब गायरान धारक मेल्यावर त्यांना न्याय मिळेल का ?

## १ ऑक्टोबर १९८१ चे जप्ती पंचनामे व सबळ पुरावे असतानाही आजपर्यंत न्याय नाही..!

माजलगांव । प्रतिनिधी

तालुक्यातील नागडगाव येथील जुना सर्व्हे नबंर ३२ व गटनंबर ११० मधील गायरान जमीन ही गेल्या आनेक वर्षापासून दलीत कुटुंब जिवनाचा उदरनिर्वाह करत आहेत त्या जमिनीमध्ये शासन परिपत्रक दि.२८ नोव्हेंबर १९९१ प्रमाणे १ ऑक्टोबर १९८१ ला जप्ती पंचनामा असताना " ती " जमिन नावावर झाली नाही नंतर कर्मवीर एकनाथराव आवाड यांनी महाराष्ट्रामध्ये गायरान धारकांची चळवळ उभी केली त्याही वेळेस २००६ ला मानवी हक्क अभियानच्या माध्यमातून नियमित होण्यासाठी तहसीलदार माजलगाव, उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई ,जिल्हाधिकारी बीड,विभागीयआयुक्त औरगाबाद,मुबंई मंत्रालयामध्ये प्रस्ताव दाखल असताना देखील प्रशासनाने सपशेल डोळे झाक करून सर्वसामान्य गायरानधारकांची दिशाभुल केली असल्याचे दिसत आहे.आर व्ही भुस्कुटे यांच्या पिटेशन चा निकाल लागल्यानंतर कोर्टाने आदेश दिला की गायरान धारकाच्या याद्या जिल्हाधिकाऱ्यांच्या वेबसाईटवर अ आणी ब परिपत्र प्रसिद्ध केले आहे त्यामध्ये अ ) १एप्रिल१९७८ ते १४ एप्रिल १९९० पर्यंत आहे,ब) परिपत्र नंतर झालेली अतिक्रमण संदर्भात आहे.

अ) परिपत्रात नाव असताना देखील प्रशासनाने

गांभीर्याने घेऊन नागडगाव येथील गाय रान धारकांना न्याय दिला नाही यापुढे विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचे १८ ऑक्टोबर १०१४ ला बीड जिल्हाधिकारी यांना पत्र आले होते प्रलंबित प्रकरणाचा अहवाल सादर करणेबाबत गायरान जमिनींचे नावे करण्याबाबत त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी माजलगाव तहसीलदार यांना ३१ ऑक्टोबर २०१४ ला पत्र व्यवहार करून प्रलंबित प्रकरणी सादर करण्यास सांगितले त्या अनुषंगाने पुन्हा पप्रस्ताव सादर करण्यात आला अध्यापही आम्हाला न्याय मिळाला नाही असे गायनधारकांचे म्हणणे आहे २५३ पानाचा अहवाल सादर असताना देखील जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणांमध्ये हलगर्जीपणा केल्याचा दिसून येत आहे यामध्ये १ ते ११,आणी १ते २०, व १ ते १२ मुद्द्यातील अहवाल तलाठी,मंडळ अधिकारी, तहसीलदार,उपविभागीय अधिकारी माजलगाव यांच्यामार्फत जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवलेला असताना देखील या प्रकरणाकडे प्रशासनाने वेळोवेळी हलगर्जीपणा केल्याची दिसून येत आहे गरीब दलित समाज न्यायच्या प्रतिक्षेत किती दिवस जगणार आता तरी प्रशासनाने मुला बाळांचा कुटुंबाचा विचार करून या जमिनी नावावर केल्या पाहिजेत असा सुर उमटत आहे. जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणांमध्ये तात्काळ अंमलबजावणी करून प्रलंबित असणाऱ्या प्रकरणाला न्याय द्यावा शासन निर्णय प्रमाणे पुरावे असून देखील गायनधारकांना प्रलंबीत का ठेवले जाते.

प्रशासनाला दलिता विषयी ४० ते ४५ वर्षाने प्रलंबित असणाऱ्या गायरान जमीन प्रकरणावर प्रश्नावर कधी न्याय देणार अशी शंका निर्माण होताना दिसत आहे !

दिनांक २८ नोव्हेंबर १९९१ शासन निर्णय प्रमाणे व १२ जुलै २०११ तील मुद्दा क्रमांक सहा नुसार प्रलंबित प्रकरणावर न्याय द्यावा अशी किंकाळी गायरान धारकातून येत आहे




आजतगायत पर्यंत या जमिनीमध्ये सात ते आठ पंचनामे झालेले असून १ ऑक्टोबर१९८१ पासून ते २०२५ पर्यंत सगळी कागदपत्रे जिल्हाधिकारी यांच्याकडे दाखल केलेली असून आज पर्यंत न्याय भेटलेला नाही न्याय मागायचा कुणाकडे हा प्रश्न गायरान धारकाकडून येत आहे . दिनांक ८ / सप्टेंबर / २०१४ /२०१५ रोजी जिल्हाधिकारी बीड यांनी गायरान जमीन प्रकरणे निकाली काढले आहेत ,नागडगावचे ही प्रलंबित प्रकरण निकाली काढावे अशी अर्त हक्क गायरान धारकाची येत आहे .

हिंगोली जिल्ह्यात सुद्धा २०१५ २०१६ मध्ये काही गायरान जमिनीचे प्रकरणे निकाली काढले आहेत तहसील कार्यालय जालना कार्यक्षेत्रातील रामनगर येथील दिनांक २८ नोव्हेंबर२०२३ ला प्रलंबीत प्रकरणे निकाली काढले आहे

## परळीत १३ डिसेंबर रोजी 'मी रमाई' या एकपात्री नाट्यप्रयोगाचे आयोजन

**परळी । प्रतिनिधी**

**बुद्धभूमी चारिटेबल ट्रस्ट आयोजित व प्रकाश वाघ निर्मित मी रमाई या एकपात्री नाट्यप्रयोगाचे परळी वैजनाथ शहरात आयोजन करण्यात आले आहे.या नाट्यप्रयोगास शहरातील बहुजनांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन निर्माते प्रकाश वाघ यांनी केले आहे. सिनेअभिनेत्री प्रियंका उबाळे या रमाईच्या भुमिकेत आहेत.**



परळी वैजनात शहरात दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ठीक ५:०० वाजता लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिरात या प्रयोगाचे सादरीकरण होणार आहे. परळी शहरातील व ग्रामीण भागातील लोकांनी परिसरातील सर्व रसिक प्रेक्षकांनी विनंती आहे की आपण जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाची शोभा वाढवावी.

या नाटकाचे दिग्दर्शक=प्राध्यापक रमाकांत भालेराव सर आहेत. लेखिका व रमाबाई आंबेडकर यांच्या मुख्य भूमिकेत आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त सिने अभिनेत्री प्रियंका उबाळे या आहेत. त्यांनी अनेक चित्रपटांमध्ये भूमिका साकारलेल्या आहेत आम्ही जरांगे,डिलिव्हरी बॉय, प्रेमवारी, मलिका = बाळूमामाच्या नावानं चांगभलं,ज्ञानेश्वर माऊली,साता जन्माच्या गाठी,अशा अनेक मालिकांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. तसेच त्यांचे शिक्षण डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नाट्यशास्त्र विभागातील विद्यार्थिनी असून त्यांनी अनेक वर्ष रमाई च्या आयुष्यावर संशोधन करुन रडणाऱ्या नाही तर लढणाऱ्या रमाईचा इतिहास सांगणारे भारतातील पहिले नाटक उभे केले आहे.

घराघरात धाडसी रमाईचा इतिहास पोहोचवणारं ही संकल्पना घेवून सध्या त्यांचा महाराष्ट्र दौरा सुरु आहे.या कार्यक्रमाला परळी शहरातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.तसेच या नाटकाचे तांत्रिक कलावंत पार्श्व संगीत =अनिल दुधाटेप्रकाश योजन,=माणिकचंद थोरात,नेपथ्य =विशाल धनंजय कहळे ,रंगभूषा = कमलाकर चव्हाण काजल चव्हाण,प्रगती गोधणे यांनी केल्या आहेत.या प्रयोगासाठी तिकीटासाठी प्रकाश वाघ मोबाईल क्रमांक ९६९९५१००४९, तसेच ९९६०५१५०५६ संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## पान ६ वरुन...

### मुख्य नाली बांधकामावर

शहरातून पाडळसिंगी ते लातूर महामार्ग जात असल्याने शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते धारूर रोड यावर नवीन सिमेंट कॉंक्रिट रस्ता व रस्त्याच्या दोन्ही साईटने नाली बांधकाम करण्यात येत आहे. यात छत्रपती शिवाजी महाराज चौक ते स्वर्गीय वसंतराव नाईक चौक पर्यंत रस्त्याच्या दोन्ही साईटने नाली बांधकामाचे काम पूर्ण झाले आहे. सदरील काम अतिशय निकृष्ट आणि बोगस झाले असल्याचे देखील व्यापाऱ्यांमधून बोलले जात आहे. यात नाईक चौक ते संविधान चौका दरम्यान दोन ठिकाणी नाली बांधकामाला भगदाड पडले असल्याचे दिसून आले आहे. तर अनेक ठिकाणी या नाली बांधकामाचे काम करत असताना संबंधित गुत्तेदाराने बांधकाम विभागातील प्रशासनाला हाताशी धरून या कामामध्ये बोगसगिरीचा हात मारला आहे. काही ठिकाणी तर नालीमधील पाणीच रस्त्याच्या साईटने बाहेर येत होते. तर काही ठिकाणी नाली बांधकाम झाल्यानंतर साईटची माती टाकत असताना नाले बांधकामाला तडे आणि बांधकाम पडलेले असताना देखील त्यावर स्लॅब टाकून काम केले आहे. नाली बांधकामाच्या साईटच्या भिंतीची शासकीय नियमाप्रमाणे जाडी न घेता वरूनच देखावा करत सदरील काम केले असल्याने अनेकांनी संताप व्यक्त केला आहे तर सदरील काम चालू असताना बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांनी याकडे का लक्ष दिले नाही ? तर संबंधित गुत्तेदराने शासकीय नियमानुसार सदरील काम न करता बांधकाम विभागातील प्रशासनाची हात मिळवणी करत या कामावर बोगसगिरीचा हात मारला ? यासह अन्य प्रश्न उपस्थित राहत असून सदरील कामाची क्वालिटी वरिष्ठ बांधकाम अधिकाऱ्यांच्या मार्फत करावी. अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

### लोकनेते स्व.गोपीनाथराव

असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार केशवराव आंधळे हे असतील. तसेच भाजपा जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, भाजपा नेते माधव निर्मळ, भाजपा तालुकाध्यक्ष सुखदेव रेडे यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. यावेळी उपनगराध्यक्ष बनसीधर मुंडे, माजी सभापती दिनकर आंधळे, सोमनाथ बडे, उपसभापती अनिल चोले, मच्छिंद्र झाटे, विश्वनाथ झाटे, महादेवबप्पा रेडे, महादेव दादा उजगरे, डॉ. रोहिदास खोटे, अशोक गोंडे यांच्यासह तालुक्यातील सर्व सरपंच-उपसरपंच, विविध संस्थांचे चेअरमन आणि मान्यवरांची विशेष उपस्थिती राहणार आहेत. मुंडे साहेबांच्या जयंतीनिमित्त तालुक्यात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून रक्तदान शिबीर हा त्याचा मुख्य आकर्षण ठरणार आहे. रक्तदान ही मानवसेवेची सर्वश्रेष्ठ देणगी आहे. एका थेंबातून जीव वाचवण्याचे पुण्य लाभते. त्यामुळे तालुक्यातील सर्व युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमात सहभाग नोंदवावा, असे आवाहन भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष तथा स्व.गोपीनाथराव मुंडे प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय आंधळे यांनी केले आहे.

### तहसील कार्यालयाच्या

त्या पाडकामातील साहित्य नेमके कोणी, कोणत्या प्रक्रियेने व किती रकमेत विकले? या गंभीर प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत. पाडकामानंतरचे स्टॉक रजिस्टर, मालमत्ता नोंद, तांत्रिक अहवाल या कोणत्याही कागदपत्रांची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून उघड करण्यात आलेली नाही.याचबरोबर परिसरातील झाडांच्या फांद्या विनापरवानगी तोडण्यात आल्या आहेत. वनविभागाकडून कोणतीही परवानगी न घेता झाडांची हानी करण्यात आली असून तरीदेखील वनविभाग व स्थानिक प्रशासन शांत का आहे? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.धोक्याचे फलक नसल्याने नागरिकांच्या जीवितास धोका दिसून येत आहे कामाचा ई-टेंडर क्रमांक, मंजुरी आदेश, अंदाजपत्रक, तांत्रिक तपासणी अहवाल, गुणवत्ता ऑडिट, अशा कोणत्याही कागदपत्रांची माहिती सार्वजनिक बांधकाम विभाग देत नसल्याने अधिकाऱ्याच्या कामकाजावर प्रश्न निर्माण होतो या सर्व घडामोडींमुळे नागरिकांकडून सार्वजनिक बांधकाम अधिकारी यांची तातडीने चौकशी करून जवाबदारांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे.वरिष्ठ अधिकारी या सर्व प्रकरणात शांत का आहेत, हेही मोठे कोडे ठरत आहे.

### फुलसांगवीकरांना लागले

गावकऱ्यांच्या वतीने या सप्ताहाची पूर्व तयारी मोठ्या जोरात होताना दिसत आहे. श्री संत वामनभाऊ महाराज मंदिराची रंगरंगोटी, परिसरातील मध्ये स्वच्छते अभियान, अन्नछत्रासाठी स्वयंपाक गृह, येणाऱ्या भाविक भक्तांच्या सुख सोयीसाठी, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, राहण्याची व्यवस्था, अध्यात्मिक कार्यक्रम श्रवण करणाऱ्या भाविक भक्तांना बसण्याची व्यवस्था, विविध आरोग्य शिबिराची नियोजन, त्याचबरोबर फुलसांगवी गावाकडे येणाऱ्या -जाणाऱ्या रस्त्यांची साफसफाई, आदी कामे गावकऱ्यांनी हाती घेतली असून या कामाची जोरदार तयारी चालू दिसत आहे. तर गावकरी भाविक-भक्त आपली लोक वर्गणी सप्ताह समितीकडे जमा करून सप्ताहाचा उत्साह वाढवत आहे. यामुळे सप्ताह पूर्वीच महिनाभरापासून गावामध्ये मोठे उत्साही वातावरण दिसत आहे.

### उसाच्या फडामधून

मुलगी व आरोपी हे दोघे ऊस तोडून कोपी मधे येताच त्यांना ताब्यात घेतले व पोस्टे सांगली ग्रामीण येथे हजर केले व टीम बीड कडे रवाना झाली. त्यानंतर ची टीम पोस्टे वडवणी येथे आली व सदर पीडीत मुलगी व आरोपीला पुढील तपासकामी पोस्टे ला हजर केले. सदर कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत सर, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली पल्लवी जाधव, पोलीस हवालदार उषा चौरे, प्रदीप येवले, अशोक शिंदे, पोशी योगेश निर्धार , अश्विन सुरवसे यांनी केली.

### स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या

सुरेश हात्ते (जिल्हा सचिव), राजेंद्र राक्षसभुवनकर (मा.उपनगराध्यक्ष), रोहित पंडित (भाजपा नेते) यांची उपस्थिती असणार आहे. या भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन भाजपचे गेवराई तालुका समन्वयक श्रीकांत सानप, सचिन दाभाडे (मंडळ अध्यक्ष, गेवराई शहर), राजेश पवार (मंडळ अध्यक्ष, गेवराई पूर्व), अँड.उद्धव रासकर (मंडळ अध्यक्ष, गेवराई पश्चिम) यांच्या वतीने करण्यात आले आहे. दरम्यान आपल्या रक्ताच्या थेंबातून अनेकांना नवी उमेद मिळू शकते, त्यामुळे भाजप गेवराई तालुक्याच्या वतीने सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी या सामाजिक उपक्रमात रक्तदान करून एखाद्याचा जीव वाचवण्याची संधी मिळत असल्याने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## दत्ताप्पा इटके गुरूजी यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार जाहीर

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

समाजासाठी निस्वार्थ वृत्तीने कार्य करणारे, सेवाभाव जपणारे आणि परळी वैजनाथ येथील वीरशैव लिंगायत समाजाचे जेष्ठ नेते दत्ताप्पा इटके गुरूजी यांच्या कार्याचा गौरव म्हणून महाराष्ट्र वीरशैव लिंगायत सभा (पुणे) तर्फे राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे. दत्ताप्पा इटके गुरुजी यांनी जीवनभर शिक्षण, संस्कार, धार्मिक व सामाजिक कार्यांद्वारे परळी तालुक्यात एक वेगळा ठसा उमटवला आहे.



दत्ताप्पा इटके गुरूजी यांनी गेल्या अनेक दशकांपासून समाजउद्धार, शिक्षण, संस्कार, सांस्कृतिक जपणूक, सामूहिक विवाह उपक्रम, गरजू कुटुंबांची मदत, आरोग्य शिबिरे, धार्मिक कार्यक्रम आणि समाजातील ऐक्य व एकात्म्यासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. समाजहितासाठी त्यांनी केलेल्या या मोलाच्या योगदानाची दखल घेत सभेच्या प्रदेश समितीने हा मानाचा पुरस्कार जाहीर केला असल्याचे सभेचे सरचिटणीस चंद्रशेखर (बाळासाहेब) होनराव यांनी पत्राद्वारे कळविले आहे.


या पुरस्काराचा वितरण सोहळा दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी सप्तशृंगी गड, ता. कलवन, जि. नाशिक येथे संपन्न होणार आहे. या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती अपेक्षित असून परळी परिसरातूनही मोठ्या प्रमाणावर प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

या प्रसंगी परळी शहरातील विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांमध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावणारे वैजनाथ विद्यालयाचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक दत्तात्रय गणपतराव (दत्ताप्पा) इटके गुरुजी यांच्या कार्याचाही विशेष गौरव करण्यात आला. त्यांनी केलेले सामाजिक कार्य हे परळीच्या विकासाचा पाया मानले जाते.

## आष्टी-डोईठाण मार्गावर किन्ही येथे तीन बिबटे दिसल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण

आष्टी । प्रतिनिधी

आष्टीडोईठाण मार्गावरील किन्ही परिसरात तीन बिबट्यांचे दर्शन झाल्याची माहिती स्थानिकांकडून समोर आली आहे. अचानक समोर आलेल्या या वन्यप्राण्यांमुळे प्रवासी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिकांनी तातडीने पोलिसांना कळवून सतर्कता वाढविण्याची विनंती केली आहे.



घटनास्थळाजवळील नागरिकांच्या मते, काही प्रवाशांनी रस्त्याच्या कडेला फिरणारे तीन बिबटे पाहिले. त्यानंतर त्यांनी त्वरित ही बाब पोलिसांना कळवली. प्रशासकीय पातळीवरही परिस्थितीवर लक्ष ठेवले जात असून, नागरिकांनी घाबरून न जाता सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**प्रवाशांसाठी सूचना :**

✻ या मार्गावरून रात्रीच्या वेळी प्रवास शक्यतो टाळावा. ✻ अत्यावश्यक असेल तर एकटे न जाता गटाने प्रवास करावा. ✻ बिबट्यांचा शोध घेण्यासाठी स्वतःहून अथवा गटाने जाण्याचे टाळावे.

**नागरिकांसाठी सूचना :**

✻ आष्टी व परिसरातील रहिवाशांनी सतर्क राहून रात्री अनावश्यक घराबाहेर पडू नये.

✻ घरातील जनावरांना सुरक्षित ठिकाणी बांधून ठेवावे; रात्री बाहेर सोडू नये.

स्थानिक पोलिसांनी नागरिकांना अफवा न पसरवता अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवण्याचे आवाहन केले आहे. तसेच कोणतीही मदत, माहिती किंवा शंका असल्यास तातडीने पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. प्रशासनाकडून संबंधित ठिकाणी गस्त वाढवून आवश्यक उपाययोजना सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे.

# जंगलतोड योजना न्यारी; बिबट्या आला आपल्या दारी

बीड । प्रतिनिधी

गेल्या काही महिन्यांपासून गावांमध्ये आणि शहरांच्या उपनगरांत जंगली प्राण्यांचा वाढता वावर नागरिकांच्या चिंतेत भर घालत आहे. कालपर्यंत जंगलात फिरणारे बिबटे, लांडगे, रानडुक्कर हे आता थेट मानवी वस्त्यांपर्यंत येऊ लागले आहेत. प्रशासनही या वाढत्या घटनांमुळे धास्तावले आहे परंतु हे प्रकार का वाढले याच्या मूळ कारणांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याची खंत वनप्रेमी प्राणी प्रेमी आणि नागरिक व्यक्त करत आहेत.

जंगलतोड, अनियमित विकास आणि सतत घटणारे हरित क्षेत्र ही काही प्रमुख कारणे आहेत जी मानवी आणि जंगली जीवसृष्टीच्या संघर्षाला कारणीभूत ठरत आहेत. नैसर्गिक अधिवास आणि



## चिंतनाचा विषय जवाबदारी कोणाची

पाण्याचे स्रोत नष्ट झाल्याने प्राणी भुकेच्या आणि पाण्याच्या व भयाच्या झळा सोसत गावाकडे वळत आहेत. या सततच्या जंगल तोडीमुळे अनेक प्रकारचे जंगली प्राणी नामशेष होण्याच्या उंबरठ्यावर आले आहेत, आणि अशीच ही स्थिती राहिली तर ते 'इतिहास जमा' होण्याची भीती निर्माण करत आहे गाव आणि शहरांत जंगली प्राण्याचा वावर का वाढला ते गावा शहरात का शिरू राहिले त्या मागील कारणांवर सरकार आणि प्रशासन फार चिंता चिंतन करताना दिसत नाही त्यावर कमी बोललं जात आहे सत्य एवढंच की, ज्या वेगाने जंगल आरीच्या तावडीत जात आहेत, त्या वेगाने प्राणीही विस्थापित होत आहेत. त्यांच्या जिवाला धोका आणि त्याचबरोबर संपूर्ण पर्यावरणाच्या समतोलालाही मोठा धोका निर्माण झाला आहे.

शास्त्र स्पष्ट आहे जर आजच सरकारने ठोस चर्चा, मंथन आणि या जंगल तोंडीवर डोंगर दऱ्याच्या उत्खनावर प्रत्यक्ष पावले उचलली नाहीत, तर पुढील काही वर्षांत पर्यावरण संकट अधिक गंभीर रूप धारण करेल.

कारण नैसर्गिक संपत्ती ही फक्त जंगलातील प्राण्यांची नव्हे तर प्रत्येक माणसाच्या जीवनाची जीवनरेखा आहे.

जंगल डोंगर दऱ्या नष्ट करण्याच्या वाढत्या घटनांचा विचार करणे ही आता केवळ प्रशासनाची जबाबदारी राहिलेली नाही, तर समाजाच्या सुरक्षेचा प्रश्न बनला आहे. मानव आणि निसर्ग यांचं सहअस्तित्व टिकवायचं असेल तर जंगल वाचवणं, पर्यावरण जपणं आणि नियोजनबद्ध विकासाचा मार्ग स्वीकारणं अत्यावश्यक आहे.

### जंगली प्राण्याचा वावर हा एक चिंतनाचा विषय झाला आहे

वाढती जंगल तोड आणि वाढते डोंगर दऱ्याचं उत्खनन आणि नद्या नाल्यावरील तसेच गायरान जमिनीवरील वाढते अतिक्रमण ही याची मुळ कारणे आहेत ज्याकडे सरकार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे सद्या गावा शहरातील वाढत्या जंगली प्राण्यांच्या वावर याचं मुळ कारण आहे हे शोधायला प्रशासन तयार नाही अथवा माहीत असून ढोंगपणाचं झोपेचं सोंग आणतंय असचं चित्र दिसतंय सरकारची ही चुप्पी बसण्याची भूमिका पर्यावर्णाला निश्चितचं बाध पोहचवणारी आहे जर प्रशासन योग्य वेळी जागं झालं नाही तर सृष्टी वरील मानव जातीचं जीवन धोक्यात येईल

-रामनाथ खोड
एक पर्यावरण प्रेमी

# विकलेल्या कांद्याचे पैसे मिळेणात

## शेतकरी थेट दिल्लीत, शरद पवारांना घातले साकडे

नाफेड व एन.सी.सी.एफ.ने खरेदी केलेल्या कांद्याचे पैसे शेतकऱ्यांना अद्याप मिळाले नाहीत. याच मुद्यावरुन नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आज दिल्लीत खासदार शरद पवार यांची भेट घेतली. खासदार भास्कर भगरे यांनी शेतकऱ्यांची शरद पवार यांच्यासोबत भेट घालून दिली. नाफेडकडून विकलेल्या कांद्याचे पैसे काढून द्या, म्हणून शेतकऱ्यांनी शरद पवार यांना साकडे घातले. दरम्यान खासदार शरद पवार यांनी शेतकऱ्यांची केंद्रीय कृषी मंत्र्याशी भेट करून देत प्रश्न सोडविण्याचे आश्वासन शिष्टमंडळाला दिले आहे. खासदार भास्कर भगरे यांची आग्रही भूमिका आहे. १५ जून ते २ ऑगस्ट २०२५ या कालावधीत शेतकऱ्यांनी नाफेडला कांदे विकले होते. यामध्ये तब्बल तीन हजारहून अधिक शेतकऱ्यांचे पैसे अडकले आहेत. नाफेड एन.सी.सी.एफ.कडे हे पैसे अडकले आहेत.

केंद्राच्या किंमत स्थिरीकरण निधी योजनेअंतर्गत नाफेड व 'एनसीसीएफ' या दोन नोडल एजन्सी यांनी प्रामुख्याने महाराष्ट्रातील नाशिक, अहिल्यानगर, पुणे व छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये तीन लाख टन कांद्याची खरेदी पूर्ण केली. मात्र, सहा महिने होऊनही थकीत २०० कोटी रुपये मिळाले नसल्याने तातडीने सदरचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याची मागणी शेतकरी करत आहेत. खरेदी झाल्यानंतर ७२ तासांच्या आत शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर थेट पैसे देण्याची घोषणा केली होती



केंद्र सरकार शेतकऱ्यांचे नाव पुढे करून ग्राहकहितासाठी कांद्याची खरेदी करते. या योजनेअंतर्गत खरेदी झाल्यानंतर ७२ तासांच्या आत शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर थेट पैसे देण्याची घोषणा सरकारकडून करण्यात आली होती. एकीकडे मे महिन्यात खरेदी सुरू होणे अपेक्षित होती; मात्र जुलै व ऑगस्ट महिन्यांत खरेदी प्रक्रिया उरकण्यात आली. खरेदीनंतर सहा महिने उलटले असून, अद्यापही त्याचे पेमेंट शेतकऱ्यांना मिळालेले नाहीत.

सध्या राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी संकटात आहेत. कारण गेल्या सहा महिन्यापूर्वी विक्री झालेल्या कांद्याचे अद्यापही पैसे शेतकऱ्यांना मिळालेले नाहीत. नाफेड आणि एन.सी.सी.एफ.ने शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात कांद्याची खरेदी केली होती. मात्र, अद्यापही शेतकऱ्यांचे पैसे दिले नाहीत. त्यामुळं शेतकरी आक्रमक झाले आहेत. आज नाशिक जिल्ह्यातील कांदा उत्पादक शेतकरी थेट दिल्लीत राष्ट्रवादी काँग्रेस चे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली. या प्रकरणात आपण लक्ष घालूव पैसे मिळवून द्यावेत असी विनंती देखील शेतकऱ्यांनी शरद पवार यांना यावेळी केली.

## थंडीमध्ये असा ठेवा कोंबड्यांचा आहार

कोंबड्यांना थंडीमध्ये ऊर्जायुक्त आहाराची गरज असते; कारण थंडीमध्ये उबदार राहण्यासाठी त्यांची बरीच ऊर्जा खर्च होते. त्या ऊर्जेची गरज आहारातून भरावी लागते. त्यामुळे कुक्कुटपालनात हिवाळ्यानुसार ऊर्जायुक्त आहार, आहारातील घटक, त्याचं योग्य प्रमाण, रोगप्रतिकारक शक्ती वाढवणारी औषधे दिल्याने पक्ष्यांवर थंडीचा विपरित परिणाम होत नाही तसेच त्यांचे आरोग्यही उत्तम राहते.

ऊर्जायुक्त आहार : हिवाळ्यात कोंबड्यांना ऊर्जायुक्त आणि स्निग्ध पदार्थांची गरज जास्त असते. बाकी वेळेस कोंबड्यांना २६०० ते २७०० किलो कॅलरी देणारे खाद्य लागते तर हिवाळ्यात त्यांना २८०० ते २९०० किलो कॅलरी देणाऱ्या आहाराची गरज असते. म्हणजे जर एक कोंबडी दररोज १०० ग्रॅम खाद्याचे सेवन करत असेल तर तिला थंडीमध्ये १२० ते १३० ग्रॅम खाद्य द्यावे. सोबत तेलाचे प्रमाणही वाढवावे.

खाद्याचे घटक : कोंबड्यांचा आहार अधिक ऊर्जायुक्त होण्यासाठी त्यांच्या आहारात मका, सूर्यफूलाच्या बिया, ज्वारी, बाजरी हे धान्य भरडून द्यावे. याशिवाय खाद्ययुक्त तेल जसे सोया तेल, फुड ग्रेडेड ऑईल, सूर्यफूल तेल कोंबड्यांना द्यावे. नेहमी ४ ते ५% तेल दिले जात असेल तर थंडीमध्ये ते ५ ते ६ % द्यावे. थंडी भरपूर वाढल्यास



कोंबड्यांना २-३ दिवस गुळाचं पाणी द्यावे. जेणेकरुन त्यांना तात्काळ ऊर्जा मिळेल.

खर्चात बचत : कोंबड्यांचा ऊर्जायुक्त आहार वाढवणे आवश्यक असते. यासाठी आहाराचे प्रमाण वाढल्याने खर्चात वाढ होत असेल तर कुक्कुटपालक आहारात काही बदल करुन खर्चात बचत करु शकतात. कोंबड्यांना एरव्ही दिले जाणारे व्हिटॅमिन्स, प्रोटीन्स आणि मिनरल्सचे प्रमाण थोडे कमी केले तरी थोड्या वेळापुरते चालते. त्यामुळे खर्चात बचत करता येते, असे अहिल्यानगर जिल्ह्यातील सहायक आयुक्त डॉ. अतुल पाटणे यांनी सांगितले.


फिडरसची संख्या : थंडीमध्ये कोंबड्यांच्या शेडमध्ये फिडरसची संख्या वाढवावी. जेणेकरुन पक्ष्यांना फार फिरावे लागत नाही आणि त्यांची ऊर्जा वाचते. शिवाय जवळच फिडरस असल्याने त्यांच्या आहारात वाढ होण्यास मदत होते.

रोगप्रतिकारक शक्ती : हिवाळा हा व्हायरच्या वाढीचा काळ असतो. त्यामुळे कोंबड्यांचे व्हायरस आणि इतर रोगांपासून संरक्षण करण्यासाठी त्यांना रोगप्रतिकारक शक्ती वाढवणारे औषध द्यावे. यामध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ई, सेलेनियम किंवा मल्टीव्हिटॅमिन द्यावे. कंपनीने दिलेल्या प्रमाणानुसार ते कोंबड्यांना द्यावे. यामुळे कोंबड्यांची रोगप्रतिकारक शक्ती तर वाढतेच शिवाय त्यांच्यावरील ताणही कमी होतो.कोमट पाणी : हिवाळ्यात कोंबड्या थंड पाणी पित नाही. त्यामुळे कोंबड्यांना पिण्यासाठी कोमट पाणी दिले तर त्यांचे पाणी पिण्याचे प्रमाण वाढते आणि पचनही चांगले होते.

## दुग्धज्वर आजाराची लक्षणे, कारणे आणि उपाय

हिवाळ्यात साधारपणे गाई आणि म्हशींमध्ये दुग्धज्वर आजार पाहायला मिळतो. दुग्धज्वर आजारालाच मिल्क फिवर असेही म्हणतात. हा आजार मुख्यत्वे संकरित गाई व म्हशींमध्ये मोठ्या प्रमाणात आढळतो. दुग्धज्वर रोग प्रामुख्याने रक्तातील कॅल्शियमच्या कमतरतेमुळे हा रोग होतो. हा आजार संकरित गाई व म्हशींमध्ये मोठ्या प्रमाणात आढळतो. तसेच या रोगाचा प्रार्दुभाव ५ ते १ वर्षे वयाच्या गाई आणि म्हशींमध्ये जास्त आढळून येतो. गाई, म्हशीं विल्यानंतर त्यांच्या शरिरातील कॅल्शियम कमी होत असल्याने विल्यानंतर काही दिवसांतच या रोगाची लक्षणे दिसून येतात.

हिवाळ्यात साधारपणे गाई आणि म्हशींमध्ये दुग्धज्वर आजार पाहायला मिळतो. दुग्धज्वर आजारालाच मिल्क फिवर असेही म्हणतात. हा आजार मुख्यत्वे संकरित गाई व म्हशींमध्ये मोठ्या प्रमाणात आढळतो. दुग्धज्वर रोग प्रामुख्याने रक्तातील कॅल्शियमच्या कमतरतेमुळे हा रोग होतो. हा आजार संकरित गाई व म्हशींमध्ये मोठ्या प्रमाणात आढळतो. तसेच या रोगाचा प्रार्दुभाव ५ ते १ वर्षे वयाच्या गाई आणि म्हशींमध्ये जास्त आढळून येतो. गाई, म्हशीं विल्यानंतर त्यांच्या शरिरीतील कॅल्शियम कमी होत असल्याने विल्यानंतर काही दिवसांतच या रोगाची लक्षणे दिसून येतात.



आजाराची लक्षणे : या आजारातील सूरूवातीचे काही दिवस प्रार्दुभाव कमी असल्याने लक्षणे लवकर लक्षात येत नाही. या आजारात जनावर सुस्त होते. चारा खाणे खाते त्यामुळे दूध कमी देते . सतत डोके हलविणे , जीभ बाहेर काढणे , दात खाणे , . शरीर थंड पडणे, शेण व लघवी बंद करणे त्यामुळे रवंथ करणे थांबून पोट फुगणे, अडखळत चालणे, या आजाराची लागण झाल्यास अशक्तपणामुळे जनावरे जास्त वेळ उभे राहू शकत नाही. या रोगाचा प्रार्दुभाव जास्त झाल्यास जनावरचा श्वास मंद होतो. लावला असता पापण्यांची हालचाल होत नाही. या अवस्थेत उपचार झाला नाही, तर जनावर दगावते.

आजाराची कारणे : रक्तातील कॅल्शियमचे प्रमाण कमी होणे हे या आजाराचे मुख्य कारण आहे. जनावरांना चाऱ्यातून कमी प्रमाणात कॅल्शियम मिळणे. जनावरांच्या आहारात कॅल्शियम व स्फुरदाचे योग्य प्रमाण नसणे. 'ड' जीवनसत्वाची कमतरता होणे. विण्यापूर्वी किंवा विल्यानंतर जनावराची होणारी उपासमार तसेच विण्याच्या सुमारास जनावरावर येणारा ताण हे ही या आजाराचे कारण होवू शकते. हिरवा चारा न मिळणे व जास्त दूध उत्पादन या कारणांनी हा आजार मोठ्या प्रमाणात जनावरांमध्ये आढळतो.

उपाय : जनावरास विण्यापूर्वी सकस आहार द्यावा. गाभण काळात जनावराची उपासमार होवू नये याकडे विषेश लक्ष द्यावे. गाभण काळात जनावरांना हिरवा चारा द्यावा. त्यामुळे जनावरांच्या शरिरातील कॅल्शियमची कमतरता भरून निघते. गाभण आणि दुधाळ जनावरास उसाचे वाढे जास्त प्रमाणात खाऊ घालू नये. पशुवैद्याच्या सल्ल्यानुसार उपचार करावेत. विण्यापूर्वी साधारण एक आठवडा जीवनसत्व ड चे इंजेक्शन देणे.

## कांदा पिकामध्ये मल्चिंग वापरण्याचे फायदे!

मल्चिंगमुळे जमिनीतील ओलावा टिकून राहतो आणि सिंचनाच्या पाळ्या सहजपणे लांबवता येतात. बाष्पीभवन कमी झाल्यामुळे कमी पाण्यातही कांदा पिकाची वाढ जोमात राहते. मल्चिंगमुळे जमिनीतील ओलावा टिकून राहतो आणि सिंचनाच्या पाळ्या सहजपणे लांबवता येतात. बाष्पीभवन कमी झाल्यामुळे कमी पाण्यातही कांदा पिकाची वाढ जोमात राहते. कांदा शेतीला हवामान बदल, पाण्याची कमतरता, वाढते उत्पादन खर्च आणि तण-किडींचा प्रादुर्भाव यांसारखी आव्हाने दिवसेंदिवस अधिक तीव्र स्वरूपात जाणवत आहेत. अशा परिस्थितीत मल्चिंग हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आणि परिणामकारक म्हणून समोर आले आहे. हे स्पष्ट झाले आहे की कांदा पिकात योग्य प्रकारचे मल्च वापरल्याने वाढ, उत्पादन, गुणवत्ता, पाण्याचा वापर आणि एकूण नफा या सर्व गोष्टींमध्ये एकाच वेळी सुधारणा दिसून येते.

उत्पादन आणि गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा : कांद्याच्या उत्पादनाबाबत बोलायचे झाले तर, मल्चिंगमुळे कांद्याच्या गाठी अधिक भरदार, वजनदार आणि आकाराने एकसमान तयार होतात, ज्याचा थेट परिणाम पिकाच्या दर्जावर आणि बाजारभावावर दिसून येतो. मल्चिंगमुळे रोपे ताणमुक्त राहतात, वाढ जोमाने होते आणि दर्जेदार कांदे अधिक प्रमाणात मिळतात. त्यामुळे शेतकऱ्यांना ग्रेड कांद्याचे उत्पादन जास्त मिळण्याची शक्यता वाढते आणि बाजारात उत्तम दर मिळतात. सध्या बाजारात ४४ इंच किंवा ५५ इंच अंतराचे पूर्व-छिद्रीत मल्च सहज उपलब्ध आहेत. या मल्चमध्ये छिद्रे आधीच तयार असल्यामुळे रोपे लावणे अत्यंत सोपे होते आणि साध्या (छिद्र नसलेल्या) मल्चच्या तुलनेत लागवडीचा वेळ व श्रम दोन्ही मोठ्या प्रमाणात कमी होतात. अशा मल्चची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे रोपांची संख्या आणि अंतर पूर्ण शेतभर



एकसमान राखले जाते. त्यामुळे रोपांमधील अनावश्यक स्पर्धा टळते आणि प्रत्येक रोपाला पाणी, पोषणद्रव्ये व प्रकाश यांसारख्या संसाधनांचा संतुलित आणि योग्य पुरवठा मिळतो. याशिवाय, पूर्व-छिद्रीत मल्चचा वापर केल्यास प्रति एकर २.५ ते २.७५ लाख रोपे एकसमान अंतरावर ठेवणे शक्य होते, जे उच्च उत्पादन मिळवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरते. मल्चिंग केल्यावर मातीतील तापमान आणि ओलाव्याचे संतुलन राखले जाते, जे कांदा वाढीसाठी अत्यावश्यक आहे. रोपे उंच आणि मजबूत वाढतात, फुलकांड्यांची संख्या वाढते आणि पात्यांची वाढ अधिक सशक्त होते. गाठी भरण्याची प्रक्रिया अधिक प्रोत्साहित होते आणि गाठींची घनता, आकारमान व गुणवत्ता सुधारते. बीज उत्पादनातही मल्चिंगमुळे फुलकांड्यांची संख्या आणि त्यांची गुणवत्ता दोन्ही लक्षणीयरीत्या वाढतात, ज्याचा थेट फायदा शेतकऱ्यांना मिळतो.

पाण्याची बचत आणि खतांचा कार्यक्षम वापर : मल्चिंगमुळे जमिनीतील ओलावा टिकून राहतो आणि सिंचनाच्या पाळ्या सहजपणे लांबवता येतात. बाष्पीभवन कमी झाल्यामुळे कमी पाण्यातही कांदा पिकाची वाढ जोमात राहते. विशेषतः पाण्याची उपलब्धता मर्यादित असलेल्या भागात मल्चिंग मोठा आधार देतो, कारण रोपे ओलाव्याच्या ताणाखाली येत नाहीत. कमी पाण्यात मिळणारे स्थिर उत्पादन शेतकऱ्यांच्या पाणी व्यवस्थापनाला अधिक सक्षम बनवते आणि शेती अधिक टिकाऊ करण्यास मदत करते.

तणांचे नियंत्रण, श्रम आणि खर्चात मोठी बचत : मल्चिंग चा सर्वात मोठा फायदा हा तण व्यवस्थापनासाठी होतो. मल्चने माती झाकली जाते, त्यामुळे तणांना उगवण्यासाठी प्रकाश मिळत नाही आणि तणांचे प्रमाण नैसर्गिकरित्या घटते. मल्चिंगमुळे खुरपणी व तणनाशक फवारणीचा प्रति एकर कमीत कमी १५,००० ते २०,००० रुपयांचा खर्च वाचू शकतो. तणांची स्पर्धा नसल्यामुळे पोषणद्रव्ये, ओलावा आणि जागा पूर्णपणे कांद्यालाच उपलब्ध होतात, त्यामुळे पिकाची वाढ अधिक जोमदार होते आणि उत्पादनात स्थिरता येते. तणनाशकांचा वापर कमी झाल्यामुळे जमिनीत रासायनिक अवशेष जाण्याची शक्यता कमी होते, ज्याचा थेट फायदा मातीतील उपयुक्त जिवाणू, गांडुळे आणि इतर सूक्ष्मजीवांना होतो. हे सूक्ष्मजीव मातीची सुपीकता, रचना आणि जैवविविधता टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असतात. तणनाशक न वापरल्यामुळे माती अधिक निरोगी राहते, सूक्ष्मजीवांची क्रियाशीलता वाढते आणि दीर्घकाळ टिकणारी मृदा-सुपीकता सुधारते. पर्यावरणाला अनुकूल असलेले हे तंत्र जगणाऱ्या मातीच्या संकल्पनेला पूरक ठरते आणि शेती अधिक शाश्वत बनवते.

रोगकिडींचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत : मल्च वापरल्यामुळे मातीचे शिंवट पानांवर उडत नाहीत आणि त्यामुळे बुरशीजन्य रोगांचे प्रमाण कमी राहते. स्थिर ओलावा मिळाल्यामुळे झाडांची प्रतिकारशक्ती वाढते, तसेच काही किडींना अनुकूल वातावरण न मिळाल्याने त्यांचा प्रादुर्भावही कमी होतो. यामुळे कांदा पिकात रोग-किडींचे व्यवस्थापन सुधारते, उत्पादन वाढते आणि साधारणतः १२ रासायनिक फवारण्या वाचू शकतात, ज्यामुळे खर्च घटतो.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६८७ : ईस्ट इंडिया कंपनी ने मद्रास मध्ये सर्वात आधी महानगरपालिका बनवली होती.
१८१६ : इंडियाना हे अमेरिकेचे १९ वे राज्य बनले.
१८४५ : पहिले आंग्ल-सिख युद्ध झाले होते.
१८५८ : बंकिमचंद्र चट्टोपाध्याय आणि यदुनाथ बोस हे कलकत्ता विश्वविद्यालयामधून पहिले पदवीधर बनले.
१९३० : सी. व्ही. रमण यांना नोबेल पारितोषिक
१९३७ : इटली ने मित्र राष्ट्र संघ ला सोडले.
१९४१ : दुसरे महायुद्ध - जर्मनी व इटली यांनी अमेरिकेविरुद्ध युद्ध पुकारले.
१९४६ : डॉ. राजेंद्र प्रसाद हे संविधान सभेचे निर्वाचित अध्यक्ष बनले होते.
१९४६ : युनिसेफ ची स्थापना
१९४६ : स्पेन या देशाला संयुक्त राष्ट्र संघाने निलंबित केले.
१९६० : लहान मुलांच्या विकासकामाला लागलेली संस्था युनिसेफ च्या सन्मानासाठी १५ नवीन टपाल तिकिटांची निर्मिती सुरु केली होती.
१९६४ : संयुक्त राष्ट्र संघाची संस्था युनिसेफ ची स्थापना.
१९६७ : कोयना येथे ६.५ रिश्टर तीव्रतेचा भूकंप होऊन १८० जण ठार आणि १५०० लोक जखमी झाले व मोठया प्रमाणात वित्तहानी झाली.
१९७२ : अपोलो मोहिमेतील अपोलो १७ हे सहावे चांद्रयान चंद्रावर उतरले.
१९९४ : अध्यक्ष बोरिस येल्त्सिन यांच्या आदेशावरुन रशियन फौजांनी चेचेन्यामधे प्रवेश केला.
२००१ : चीनचा वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन मधे प्रवेश
२००३ : मेरिदा येथे ७३ देशांनी भ्रष्टाचार विरोधी करारावर सह्या केल्या.
२००७ : उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरिया यांच्या मध्ये ५० वर्षांनंतर पुन्हा रेल्वे सेवा पुर्वव्रत.
२०१४ : भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदीयांनी सुरुवात केलेल्या योग दिवसाला संयुक्त राष्ट्र संघटनेने स्वीकृती दिली होती.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१० : फ्रांस चे प्रसिद्ध कवी अल्फ्रेड डोमोसे यांचा जन्म.
१८४३ : रॉबर्ट कोच - क्षयरोगावरील मूलभूत संशोधनासाठी १९०५ मध्ये नोबेल पारितोषिक मिळालेले जर्मन डॉक्टर (मृत्यू: २७ मे १९१०)
१८६७ : 'उपन्यास सम्राट' रजनीकांत बर्दोलोई आसामी कादंबरीकार, आसामी ऐतिहासिक कादंबरीचे जनक (मृत्यू: २५ मार्च १९४०)
१८८२ : सुब्रम्हण्यम भारती - तामिळ साहित्यिक (मृत्यू: ११ सप्टेंबर १९२१)
१८९२ : अयोध्या नाथ खोसला - स्थापत्य अभियंते, पाटबंधारे व जलनिस्सारण आयोगाचे अध्यक्ष, पद्मभूषण (१९५४), रुरकी विद्यापीठाचे कुलगुरू (१९५४ १९५९), राज्यसभा खासदार (१९५८ १९५९), योजना आयोगाचे अध्यक्ष (१९५९), राष्ट्रीय विज्ञान अकादमीचे अध्यक्ष (१९६१ १९६२), ओरिसाचे राज्यपाल (१९६२ १९६६), पद्मविभूषण (१९७७)
१८९९ : पु. य. देशपांडे - कादंबरीकार व तत्त्वचिंतक
१९०९ : नारायण गोविंद कालेलकर - साहित्य अकादमी पारितोषिक विजेते (१९६८) भाषाशास्त्रज्ञ.
१९१५ : मधुकर दत्तात्रय तथा बाळासाहेब देवरस - राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तिसरे सरसंघचालक (मृत्यू: १७ जून १९९६)
१९२२ : मोहम्मद युसुफ खान ऊर्फ दिलीपकुमार - चित्रपट अभिनेता, पद्मभूषण (१९९१), दादासाहेब फाळके पुरस्कार (१९९४), राज्यसभा खासदार, मुंबईचे नगरपाल
१९२५ : राजा मंगळवेढेकर - बालसाहित्यकार (मृत्यू: १ एप्रिल २००६)
१९२९ : सुभाष गुप्ते - लेगस्पिनर (मृत्यू: ३१ मे २००२)
१९३१ : भगवान श्री रजनीश (मृत्यू: १९ जानेवारी १९९०)
१९३५ : भारताचे राष्ट्रपती आणि अर्थतज्ज्ञ प्रणवकुमार मुखर्जी यांचा जन्म.
१९४२ : आनंद शंकर - प्रयोगशील संगीतकार (मृत्यू: २६ मार्च १९९९)
१९६९ : विश्वनाथन आनंद - भारतीय ग्रँडमास्टर व विश्वविजेता
१९८२ : ला तमिळ चे प्रसिद्ध लेखक सुब्रह्मण्य भारती यांचा जन्म.
२००६ : अंतराळवीर सुनिता विल्यम आय. एस. एस. (आंतरराष्ट्रीय स्पेस स्टेशन) वर पोहोचली.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७८३ : रघुनाथराव पेशवा (जन्म: १८ ऑगस्ट १७३४)
१९३९ : उत्तर प्रदेश चे प्रसिद्ध वकील आणि सार्वजनिक कार्यकर्ते जगत नारायण मुल्ला यांचे निधन.
१९४९ : प्रसिद्ध विचारक आणि लेखक कृष्णचंद्र भट्टाचार्य यांचा जन्म.
१९८७ : गुरूनाथ आबाजी तथा जी. ए. कुलकर्णी साहित्य अकादमी पुरस्कार विजेते गूढकथालेखक (जन्म: १० जुलै १९२३)
१९९८ : रामचंद्र नारायण द्विवेदी ऊर्फ कवी प्रदीप 'ए मेरे वतन के लोगो' या गाण्यामुळे प्रत्येक भारतीयाच्या काळजाला भिडणार्‍या रचनेमुळे आपले वेगळेपण ठसविणारे आधुनिक राष्ट्रकवी (जन्म: ६ फेब्रुवारी १९१५)
२००१ : झांबिया देशाचे पहिले पंतप्रधान मेन्झा चोना यांचे निधन. (जन्म: २१ जानेवारी १९३०)
२००१ : रामचंद्र नारायण दांडेकर - भाषातज्ज्ञ आणि वैदिक संस्कृतीचे अभ्यासक (जन्म: १७ मार्च १९०९)
२००२ : नानाभॉय अर्देशीर ऊर्फ 'नानी' पालखीवाला - कायदेपंडित आणि अर्थतज्ज्ञ (जन्म: १६ जानेवारी १९२०)
२००४ : एम. एस. सुब्बुलक्ष्मी - विख्यात शास्त्रीय गायिका (जन्म: १६ सप्टेंबर १९१६)
२०१३ : भारतीय तत्त्ववेत्ता आणि विद्वान शेख मुसा शरीफी यांचे निधन.
२०१५ : भारतीय चित्रकार आणि मूर्तिकार हेमा उपाध्याय यांचे निधन.



गुरुवार दि.११ डिसेंबर २०२५ ५

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत




# दोन अल्पवयीन मुलींना सुखरुप घरी आणल्याने नातेवाईकांनी मानले आभार

जालना। प्रतिनिधी

नऊ दिवसांपासून हरवलेल्या बदनापूर येथील १४ वर्षांची आणि मांजरगाव येथील १५ वर्षांची अशा दोन मुलींचा पोलिसांनी शोध लावून त्यांना सुरक्षितपणे पालकांच्या ताब्यात सुपूर्त करण्याची उल्लेखनीय कामगिरी केली आहे. याप्रकरणी पोलीस प्रशासनाने तात्काळ तपास लावल्यामुळे पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल , अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांचे आभार मानले. १ डिसेंबर रोजी दोन्ही मुली घरच्यांना न सांगता बाहेर पडल्या. सकाळी शाळेत जात असतांना घरी सांगितले की आज शाळेत कार्यक्रम आहे घरी येण्यासाठी उशार होईल असे सांगून शाळेत गेल्या होत्या नंतर संध्याकाळी ५ वाजेपर्यंत दोघीही घरी परतल्या नसल्याने घरातील लोकांना त्यांची शोधा शोध घेतला असता त्या दोघीही मिळून आल्या नाहीत. त्याचा रात्री उशीरा पर्यंत शोध घेतला असता त्या मिळून न आल्याने पालकांनी पोलिस स्टेशनमध्ये त्या हरविल्या बाबतची तक्रार दाखल केली होती.



प्रकरण गंभीर असल्याचे लक्षात घेऊन पोलिस निरीक्षक एम. टी. सुरवसे यांनी तत्काळ लहान मुलींना पळवून नेल्याचा गुन्हा नोंदवून तीन स्वतंत्र पथकांमार्फत व्यापक शोध मोहीम राबवली. एक पथक बिहार-उत्तर प्रदेश-नेपाळ, दुसरे मुंबई आणि तिसरे स्थानिक परिसरात असे विभाजन करण्यात आले. दरम्यानच्या काळात आपला घरातील लोकांना शोध घेता येऊ नये यासठी मुलींनी आपलेकडे असलेले मोबाईल व सिम कार्ड बंद केले होते. परंतू जेथे भेटले तेथे इन्टनेटचा उपयोग करुन त्या चालू करत होत्या सदर मुली या बदनापूर हुन जालना, मुंबई, जैननगर (बिहार), जनकपुर (नेपाळ) असा अंदाजे २००० किलोमिटर प्रवास करुन नेपाळ मध्ये पोहचल्या नेपाळ मध्ये दोन दिवस मुक्काम करुन जनकपुर परीसर, जानकीमंदिर इत्यादी परीसराला भेट देऊन फिरत असतांना जनकपुर नेपाळ येथील रेल्वे स्टेशनवरोल त्यांनी इन्टरनेट वापरल्याचे तांत्रीक तपासात निष्पन झाल्याने मा. आयुष नोपाणी, अपर पोलीस अधिक्षक यांनी बिहार तसेच नेपाळ येथील पोलीसांशी संपर्क साधून मुलीबाबतची माहिती घेऊन त्याठिकाणी एक पथक तात्काळ रवाना केले. दरम्यान सदर मुलींनी नेपाळ सोडून पुन्हा रेल्वेने मुंबईला येत असतांनी अदित्य झा नावाच्या प्रवाशींची त्यांची ओळख झाली होती तेव्हा रेल्वे प्रवासात त्यांनी अदित्य झा यास विनंती केली की त्यांना मुंबई मध्ये भाड्याने रुम पाहिजे आहे तेव्हा त्याने त्यांना रुम करुन देतो असे सांगितले होते. त्याच वेळी त्यांचे इन्टरनेट सुध्दा मुलींनी वापरले होते. त्या दरम्यान तांत्रीक तपास करुन मुलीं ह्या पवन एक्सप्रेस रेल्वेने जैननगर येथून ठाणे येथे येत असल्याची माहिती मिळाली त्याप्रमाणे ठाणे कळवा येथे दुसरी पोलीस पोलीस टिम रवाना केली असता मुंबई कळवा येथे दोन्ही मुली सुखरुप मिळून आल्या त्यांना ताब्यात घेऊन त्यांना त्यांचे नातेवाईकांचे ताब्यात देण्यात आले आहे. आज रोजी मुली आपल्या घरी सुखरुप आल्या याबाबत मुलींचे नातेवाईक यांना विश्वास बसत नव्हता पोलीस स्टेशन बदनापूर येथे येऊन पेठे वाटप केले व पोलीसांचे आभार मानले तसेच या मुलीच्या शोध मोहिमेमध्ये मा. श्री अजय कुमार बन्सल, पोलीस अधिक्षक व मा. श्री आयुष नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक यांनी तपास प्रकरणी लक्ष दिल्यामुळे दोन्ही पोलिस अधिकाऱ्यांचा सतिश आरसुळ, बद्रीनाथ आरसुळ, सिध्देश शेळके, डॉ रामेश्वर पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन आभार मानले.

# जामखेड-सौताडा रस्त्याच्या कामामुळे जामखेडकर भोगतायत मरणयांतना

## लोकप्रतिनिधी रस्त्याबाबत गांभीर्यहीन;नागरिकांमध्ये तीव्र संताप!

जामखेड। प्रतिनिधी

गेल्या अडीच तीन वर्षापासून जामखेड सौताडा या राष्ट्रीय महामार्गचे काम सुरु असून मुख्य रस्ता असलेला खर्डा चौक ते समर्थ हॉस्पिटल पर्यंतचा शहरातर्गत रस्त्याच्या कामाला गती मिळेना. या रस्त्यामध्ये मुरूम टाकल्याने रस्त्याची घसरगुंडी झाली आहे. यामध्ये अनेक वाहन चालक या रस्त्यात पडल्याने दुखापत होत आहे. याकडे प्रशासनाने गांभीर्याने घेण्याची गरज आहे. जामखेडकर या रस्त्यामध्ये मरणयांतना भोगताना दिसत आहे. त्यामुळे हा रस्ता करताना ठेकेदार याची मुजोरी वाढली असल्याने त्यांना कुणाचा धाक राहिला नसल्याने कामाबाबतीत दिरंगाई सुरू आहे. हा रस्ता होताना अपघातात अनेक जणांचे बळी गेले आहेत. ठेकेदार याला आजुन किती बळी घेणार असल्याचा सवाल जामखेड चे नागरिक करताना दिसत आहे.



सभापती प्रा राम शिंदे , खासदार निलेश लंके , आ रोहित पवार आदी दिग्गज नेते असताना देखील या रस्त्याच्या कामाबाबत लोकप्रतिनिधी चकार शब्द बोलत नसल्याने नागरीक म्हणतात जामखेड-सौताडा रस्त्यात नेमकं दडलंय काय? लोकप्रतिनिधी देखील याकडे दुलक्ष करत आहेत. त्यामुळे पदाधिकारी , प्रशासनाची , ठेकेदार यांची निष्क्रियता चव्हाट्यावर आल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त करत आहेत. काम करताना कुठेही सुसूत्रता नाही. सिमेंट नळी च्या वर स्लॅब टाकत असल्याने गटारीचे काम देखील निकृष्ट करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

गेल्या अडीच ते तीन वर्षांपासून रखडलेले जामखेड शहरातील राष्ट्रीय महामार्गाचे काम आजूनही पूर्णत्वाकडे गेले नाही. रस्त्याचे काम रखडलेले असल्याचे दिसत आहे. रस्त्याच्या गटारी देखील मागेपुढे होत आहेत. गटार चे काम एक सरळ रेषेत होणे क्रमप्राप्त असताना देखील ते होत नाही. गटारी बाबत नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे .राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाची व ठेकेदार यांची निष्क्रियता चव्हाट्यावर येत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त करत आहेत. खर्डा चौक ते समर्थ हॉस्पीटल पर्यंतच्या रस्त्याचे काम सुरू असून ते काम निकृष्ट दर्जाचे सुरू आहे. या रस्त्याच्या कामाबाबत आ सुरेश धस यांनी जामखेड येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभेमध्ये ठेकेदार खूप संथगतीने काम करत आहे. त्या ठेकेदार यावर कारवाई करून हा रस्ता तात्काळ पूर्ण करावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घालावे अशी भर सभेत त्यांनी विनंती केली .आ धस यांच्या त्या वक्तव्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तो ठेकेदार सापडून आपण ते काम पूर्ण करू असे आश्वासन जामखेड नगरपरिषद निवडुकीदरम्यान केले होते. परंतु तेव्हा पासून ठेकेदार यांच्या मुजोरीत वाढ झाली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेकडे देखील ठेकेदार यांनी केराची टोपली दाखवली असल्याची चर्चा जामखेड मध्ये रंगली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून खरडा चौक ते समर्थ हॉस्पिटल पर्यंतचा रस्ता हा खोदून ठेवला आहे त्यामुळे रस्ता खोदल्यामुळे धुर उडत आहे. धूळ उडू नये म्हणून टँकर ने त्या रस्त्यावर पाणी टाकले जात आहे. परंतु त्या टँकर द्वारे टाकलेल्या पाण्याचा रस्त्यावर मोठ्या प्रमाणात साचत आहे. त्या साचलेल्या पाण्याने दुचाकी स्वरांचे घसरून अपघात होत आहेत. दुचाकी गाडीवरून पडत अनेकांना अपंगत्व येत आहे. त्यामुळे त्या रस्त्याकडे ठेकेदार व राष्ट्रीय महामार्ग चे अधिकारी यांनी लक्ष दिले नाही तर मोठे आंदोलन करणार असल्याचा इशारा मनसेचे तालुका अध्यक्ष प्रदीप टापरे यांनी दिला आहे.

---

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी-२३९३
PHno ०२४८३-२७१७८७ दिनांक:-१०/१२/२०२५

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार दिक्षा जालींदर खरात रा. ता. घनसावंगी जि.जालना यांनी नामे भिमराव धारुजी गायकवाड रा. भायगव्हाण ता. घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं ३४५ दि. ११/०२/२०२० या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं ३४०८ दिनांक:-१०/१२/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. भिमराव धारुजी गायकवाड रा. भायगव्हाण ता.घनसावंगी जि. जालना नावावर असलेला गट नं (-) मधील प्लॉट नं. सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं. १२७९/२ मधील क्षेत्र १०१.२० चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- रमेश धारुजी गायकवाड यांची जागा
पश्चिम :- आत्माराम माधवराव गंगतिरे यांची जागा
दक्षिण :- आत्माराम माधवराव गंगतिरे यांची जागा
उत्तरेस :- १६ फुटाचा रस्ता

या वरील चतु:सिमा मधील क्षेत्र १०१.२० चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर / आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगरपंचायत घनसांवगी

---

# वंचित, उपेक्षित गायरान धारकांना न्याय हक्कासाठी मानवी हक्क अभियानच्या वतीने तहसीलदारांना निवेदन

घनसावंगी। प्रतिनिधी

१० डिसेंबर मानवी हक्क जागतिक दिनानिमित्त व मानवी हक्क अभियान स्थापना दिनानिमित्त तहसिलदार घनसावंगी यांच्या मार्फत मा,ना, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना दलित, आदिवासी, गायरानधारक, वंचित घटक, निराधार, शेतकरी, शेतमजूर, भुमिहीन, ईमारत बांधकाम, ऊसतोड कामगार यांच्या विविध मागण्यांचे निवेदन मानवी हक्क अभियान जालना जिल्हा अध्यक्ष अंकुश सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली देण्यात आले मानवी हक्क अभियान संस्थापक अध्यक्ष कर्मवीर एकनाथ आवाड साहेब यांच्या हयात काळात १० डिसेंबर १९८९ साली संघटनेची स्थापना झाली दलित, आदिवासी, गायरानधारक, वंचित घटक, निराधार, शेतकरी, शेतमजूर, भुमिहीन, ईमारत बांधकाम, ऊसतोड कामगार यांना लोकशाही मार्गाने जिवन जगता यावे मानुस म्हणून जगण्याचा अधिकार मिळावा शासन दरबारी न्याय व हक्क मिळाला या अनुषंगाने कर्मवीर एकनाथ आवाड साहेब यांनी मानवी हक्क अभियान संघटनेची स्थापना करण्यात आली पुढील संघटनेचा वारसा चालविण्यासाठी प्रोफेसर जे, एन, यु, दिल्ली मिलिंद नाना आवाड साहेब यांना मानवी हक्क अभियान राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून भारत संघटनात्मक काम करत आहे



यांच्या नेतृत्वाखाली आज दिनांक १० डिसेंबर २८२५ रोजी जालना जिल्ह्यात तहसिल कार्यालय घनसावंगी येथे धरणे आंदोलन करुन तहसिलदार घनसावंगी यांच्या मार्फत मा, ना, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले गायरान जमिन कास्तकरांच्या नांवे करण्यात यावे

शासनस्तरावरून उभारण्यात येणारे सौर ऊर्जा प्रकल्प गायरान जमिनीमध्ये उभारण्यात येऊ नाही अ,ब,की,ड वग्रीकतण करून मातंग समाजाला सामाजिक न्याय देण्यात यावा शासनाने देउ केलेल्या सर्व जमिनी वर्ग १ मध्ये विना अट वर्ग करण्यात यावा अशा मागण्या करण्यात आल्या यावेळी प्रमुख उपस्थिती मानवी हक्क अभियान जालना जिल्हा अध्यक्ष अंकुश सोनवणे मानवी हक्क अभियान जालना जिल्हा उपाध्यक्ष अंबादास जाधव स्वपनिल संतोष थोरात, विशाल हिवाळे प्रदीप गोरख थोरात, सुभाष सुतार रामदास भालेराव, सुनिल शेडगे सुनिल गुढेकर परमेश्वर सोनवणे अभियान गुढेकर दता गुढेकर इत्यादी.

---

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/५६८
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- २४/९/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) अमर इद्रिस बाशन सर्व्हे सर्व्हे नं. ४५४/१ प्लॉट नंबर १७ सिटी सर्व्हे नंबर २९६६/१७ नं.प.मि.नं.१८-१६७-१४७ व प्लॉट नंबर १८ सिटी सर्व्हे नंबर २९६६/१८ नं.प.मि.न. १८-१६७-१८ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१६७-१४७,१८-१६७-१८) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- प्लॉट नंबर ९
पश्चिम :९ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण- प्लॉट नंबर १८
उत्तरः प्लॉट नंबर १६

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

---

# टेकडी पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करणार-आशिमा मित्तल

जालना । प्रतिनिधी

पारसी टेकडीला पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून, या भागाचे सुशोभीकरण करून ते पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र बनविण्यात येईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले. इरकॉन भोज कंपनीच्यावतीने पारसी टेकडी येथील घनवनात १००० वृक्षांची लागवड करण्यात आली असून त्याचे लोकार्पण मंगळवार दि. ९ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांच्या हस्ते झाले, याप्रसंगी व त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी पी. एम. मिन्नू, अतिरिक्त पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, संस्थेचे विश्वस्त निलकंठण अय्यर, रमेशभाई पटेल, सुनिल रायठठ्ठा, शिवरतन मुंदडा, नितीन काबरा, गोविंद गोयल, राहूल अग्रवाल, विठ्ठल पवार, प्रकाश सिगेदार, सुरेश कुलकर्णी, हेमंत ठक्कर, यश पूरी, आशुतोष सोनी, सचिन लोहीया, डॉ. रितेश अग्रवाल, चिराग तलरेजा, यांच्यासह विविध सामाजिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी मित्तल म्हणाल्या की, पारसी टेकडी परिसरात नैसर्गिक सौंदर्य ऐतिहासिक महत्त्व असलेली ठिकाणे असल्याने येथे पर्यटनाच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. या ठिकाणाचा विकास झाल्यास रोजगार निर्मितीबरोबरच स्थानिक अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे. परिसरात रस्ते, पिण्याचे पाणी, प्रकाशयोजना, बसण्याची व्यवस्था, पार्किंग, कचरा व्यवस्थापन, सुरक्षा तसेच माहिती फलकांची उभारणी यांसारख्या मूलभूत सुविधा उभारण्यात येणार आहेत. इरकॉन भोज कंपनीच्या वतीने पारसी टेकडी येथील घनवनात १००० वृक्षांचे संगोपन करण्याचे काम समस्त महाजन, कुंडलिका व सिना फाउंडेशन करणार आहे. केशवसृष्टी संस्थेने आतापर्यंत ६५ हजार वृक्ष पारसी टेकडीवर लावलेले असून ३.५ लाख वृक्ष संवर्धित होत आहेत. लोकसहभागातून पारसी टेकडीवर वृक्षारोपण वृक्षसंवर्धन कार्य सुरू असून विविध सामाजिक संस्था, उद्योग समूह सक्रियपणे येथे योगदान देत आहेत. केशवसृष्टी संस्थेचे निलकंठण अय्यर यांचे जालना शहरवासियांच्यावतीने आभार व्यक्त करत विशेष सत्कार करण्यात आला.

---

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/६५६
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ०४/११/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) गणेश रमेश धुमाळ २)उमेश रमेश धुमाळ ३) भाग्यश्री गणेश धुमाळ सर्व्हे नं.-४५१ प्लॉट नं. १२ नं.प.मि.नं.१८-१८०-१२ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१८०-१२) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- प्लॉट नंबर १३
पश्चिम :९मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण- ९मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
उत्तरः प्लॉट नंबर ११

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

---

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/६७९
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ११/११/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) अमर इद्रिस बाशन सिटी सर्व्हे नं.-१३५४ नं.प.मि.नं.१२-७४ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१२-७४) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- लिहून देणाऱ्याची उर्वतर जागा
पश्चिम :खिजर इद्रिस बाशन याची याच सिटी सर्व्हे नंबर मधील ७४.३४ चौसर मिटर क्षेत्राची जागा
दक्षिण- महमद मुबारक बाशन याचे घर
उत्तरः नगर परिषद रस्ता

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

---

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/५६७
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- २४/०९/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) अमर इद्रिस बाशन सर्व्हे नं.१ प्लॉट नंबर १ सिटी सर्व्हे नं. १८७५/अ-१ नं.प.मि.नं.१८-११२-०१ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-११२-०१) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- आम्हा विक्रेत्यांची उर्वरित जागा
पश्चिम :९ मिटर रुंदीचा सिमेंट रस्ता
दक्षिण- खिजर इद्रिस बाशन यांनी आज रोजी खरेदी घेतली जागा
उत्तरः आम्हा विक्रेत्यांची उर्वरित जागा

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

---

# लोकअदालतीमध्ये अनाधिकृत नळ धारकांनी ७५०० शुल्क भरणा करावा : जिल्हाधिकारी

जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील अनाधिकृत नळ धारकांचे सर्वेक्षणाचे काम महानगरपालिकेच्या वतीने नियुक्त साई एजन्सी, जालना मार्फत पुर्ण केले आहे. नळ कनेक्शन धारकाच्या सर्वेक्षण अर्जांची कर विभागाच्या अभिलेखाशी पडताळणी करुन त्यामध्ये अनाधिकृत असलेल्या नळ धारकांना रु. १०,०००/- भरणा करुन नळ कनेक्शन नियमित करण्याच्या सुचना देण्यात आलेली आहे.

मा. आयुक्त तथा प्रशासक, जालना मनपा यांच्या प्रशासकीय ठरावानुसार अनाधिकृत नळ कनेक्शन नियमित करणे करिता अनाधिकृत नळ धारकांकडुन दिनांक २१/११/२०२५ ते दिनांक २०/१२/२०२५ रोजीपर्यंत रु. १०,०००/- ऐवजी रु. ७५००/- शुल्क भरुन घेणे करिता सवलत देण्यात आली आहे. करिता दिनांक २१/११/२०२५ ते दिनांक ०९/१२/२०२५ रोजीपर्यंत एकुण ४४१ अनाधिकृत नळ धारकांनी सवलतीचा लाभ घेतला आहे. मा. विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, जालनाच्या वतीने दिनांक १३/१२/२०२५ रोजी लोक अदालतचे आयोजन केले असून यामध्ये अनाधिकृत नळ कनेक्शन धारकांना देण्यात आलेल्या नोटीस संदर्भात प्रकरणे तडजोड करण्यात येणार आहे. यामध्ये अनाधिकृत नळ कनेक्शन धारकांकडुन तडजोडीपोटी रु. १०,०००/- ऐवजी रु. ७५००/- शुल्क भरुन घेणे करिता सवलत देण्यात आली आहे. जालना शहरातील नागरिकांनी सदरील सवलतीचा लाभ घ्यावा. जे नागरिक अनाधिकृत नळ कनेक्शन असल्याबाबत शुल्क रक्कम भरणार नाहीत, त्यांच्या मालमत्तेवर रु. १०,००० चा बोजा टाकण्यात येईल व तदनंतर अनाधिकृत नळ धारकांचे नळ कनेक्शन खंडीत करण्यात येवुन त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

---

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/६८८
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- १४/११/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) अशोक रोहिदास येवले सर्व्हे नं.-३५ सहन प्लॉट नं. २२ सिटी सर्व्हे नं. १८६४/अ/२३ नं.प.मि.नं.१८-१२५-२२ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१२५-२२) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- खुली जागा
पश्चिम :९मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण- प्रकाश सुभाष सुस्कर यांनी आज रोजी खरेदी केली याच प्लॉट मधील भाग
उत्तरः १२ मिटर रुंदीचा डीपी रोड

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

---

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/६८५
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- १४/११/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) प्रकाश सुभाष सुस्कर सर्व्हे नं.-३५ सहन प्लॉट नं. २२ सिटी सर्व्हे नं. १८६४/अ/२३ नं.प.मि.नं.१८-१२५-२२ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१२५-२२) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- खुली जागा
पश्चिम : ९मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण- खुली जागा
उत्तरः अशोक रोहिदास यांनी आज रोजी खरेदी केली याच प्लॉट मधील भाग

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

---

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/६५७
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ०७/११/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) सतीष विठ्ठल काळे सर्व्हे नं.-८० प्लॉट नं. २९ नं.प.मि.नं.१८-१२०-२९ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१२०-२९) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- ६ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम : प्लॉट नं २० मधील भाग
दक्षिण- प्लॉट नं. ३०
उत्तरः याच प्लॉटमधील पार्वतीबाई काळे यांनी खरेदी घेतलेला भाग

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

# कापूस,सोयाबीन उत्पादक शेतकरी व्यापक जनआंदोलनाच्या तयारीत

## भाववाढीसाठी बीड जिल्ह्यात गावा-गावात शेतकऱ्यांची जमवाजमव सुरू

बीड । प्रतिनिधी

उसाच्या भाववाढीसाठी झालेल्या राज्यव्यापी आंदोलनानंतर आता बीड जिल्ह्यातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकरी सरकारविरोधात मोठ्या प्रमाणावर जनआंदोलन उभारण्यासाठी सज्ज झाले आहेत. शेतमालाला हमीभाव न मिळाल्याने, उत्पादन खर्चापेक्षा बाजारभाव कमी असल्याने आणि सातत्याने होत असलेल्या आर्थिक तोट्यामुळे शेतकऱ्यांच्या असंतोषाला उधाण आले आहे. याच पार्श्वभूमीवर बीड तालुक्यात शेतकरी, शेतकरी पुत्र व युवा नेतृत्व हे गावागावातील बैठकींद्वारे सबंध जिल्ह्यात जनआंदोलनाचे जाळे विणण्यात गुंतले आहेत

संत तुकाराम बाबा महाराज यांच्या पुण्यभूमी पारगाव जप्ती येथे या आंदोलनाच्या तयारीची पहिली बैठक घेण्यात आली. पन्नास वर्षांपासून शेतकरी चळवळींचा इतिहास असलेल्या या भूमीतून शेतकऱ्यांचे आवाज उठताच त्याला जिल्ह्यात सर्वत्र प्रतिसाद मिळू लागला.

या बैठकीनंतर काही दिवसांतच नांदुर, पाली, अंथरवन, प्रिंप्रि, नाळवंडी, चौसाळा या गावांमध्ये शेकडो शेतकरी सहभागी असलेल्या शक्तीप्रदर्शनाच्या बैठकांचा सिलसिला सुरू झाला. प्रत्येक बैठकीत भाववाढ, हमीभाव, हमीखरेदी, तात्काळ आर्थिक मदत, पीकविमा दावे, बाजार समित्यांचे प्रश्न अशा अनेक मुद्द्यांवर गरमागरम चर्चा झाली.

सकाळी नाळवंडी येथे सकाळी ९ वाजता मोठा जमाव झाला. याठिकाणी शेतकऱ्यांनी




कापूस- सोयाबीनाला किमान उत्पादनखर्चाच्या दीडपट दराने खरेदी करण्याची मागणी एकमुखाने मांडली. यानंतर दुपारी २ वाजता बाळघाट, चौसाळा येथे दुसरी मोठी बैठक झाली. यात विविध संघटना, पक्ष, गावांतील तरुण शेतकरी, महिला शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले

या दोन्ही बैठकींना युवा शेतकरी राजेंद्र आमटे,आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे,सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे,अॅड. गणेश मस्के,शिवशाहू संघटनेचे बाळासाहेब मोरे पाटील,प्रा. ज्ञानेश्वर राऊत (आप संघटन मंत्री),माजी सरपंच राधाकिसन म्हेत्रे,माऊली शिंदे, सुहास जयभये, दत्ता सुरवसे, दशरथ हबरे, प्रमोद नाईकवाडे, गणेश नाईकवाडे आदी शेतकरी नेते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकऱ्यांनी या आंदोलनात

कापूस १० हजार व सोयाबीनाला ७ हजार लाभदायक हमीभाव जाहीर करावा, किमान आधारभूत किंमतीपेक्षा वाढीव दराने तात्काळ खरेदी सुरु करावी, ,पीकविमा भरपाई, विमा सर्वेक्षणातील विलंब, अपूर्ण दावे यावर तोडगा काढावा, शेतकरी सी सी आय ऑनलाईन प्रकिया सुरळीत करावी , बाजार समितीतिल दलालशाही व मनमानी रोखावी, शासनाने 'उत्पादन खर्च + ५०% नफा' या २+५०% सूत्राची अंमलबजावणी करावी आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

शेतकऱ्यांचा आरोप आहे की शासन घोषणाच करते, पण प्रत्यक्ष खरेदी केंद्रावर दर कमी, तौल तोटा व विलंबित देयके यामुळे शेतकरी आर्थिक कोंडीत सापडतात.

शेतकरी जनआंदोलनाचा आराखडा ठरवण्यासाठी बीड शहरात महत्त्वाची बैठक आयोजित केली आहे या बैठकीतदि. ११ डिसेंबर, गुरुवारी सकाळी ११ वाजता हॉटेल बालाजी सम्राट चौक, पांगरी रोड, बीड येथे होणार असून या बैठकीत जिल्हाभरातील शेतकरी, युवा शेतकरी, शेतकरी पुत्र, ज्येष्ठ शेतकरी यांचा प्रचंड जमाव अपेक्षित असून या बैठकीत आंदोलनाचा अंतिम कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी इच्छुकांनी मुलाखत अर्ज करावेत : सचिन मुळूक

बीड । प्रतिनिधी

शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी शिवसेनेने जोरदार तयारी सुरू केली आहे. पक्षसंघटना अधिक बळकट करत तळागाळातील कार्यकर्त्यांना संधी देण्याच्या उद्देशाने इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येणार असून, परळी, अंबाजोगाई व केज तालुक्यातील गट व गणातून निवडणूक लढवू इच्छिणाऱ्यांनी संबंधित तालुका शिवसेना कार्यालयात मुलाखत अर्ज भरून सादर करावेत, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केले आहे.



शिवसेनेच्या परळी, केज व अंबाजोगाई तालुका कार्यालयात मुलाखतीचे अर्ज उपलब्ध असून, अर्जामध्ये इच्छुकांनी स्वतःची वैयक्तिक माहिती, राजकीय व सामाजिक पार्श्वभूमी, संबंधित गटाची लोकसंख्या व इतर तपशील, तसेच उमेदवारी मूल्यमापनासाठी आवश्यक माहिती भरणे बंधनकारक आहे. यासोबतच पक्षाचे घोषणापत्रही अर्जासोबत जोडावे लागणार आहे. अर्ज सादर करताना ओळखपत्र, मतदार ओळखपत्र, मतदार यादी उतारा, ऑफिडेव्हिट, तीन पासपोर्ट आकाराचे फोटो, नामनिर्देशक, गॅझेट व जातीचा प्रवर्ग प्रमाणपत्र अशी आवश्यक कागदपत्रे जोडणे गरजेचे असल्याचेही मुळूक यांनी स्पष्ट केले. शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विकासाभिमुख नेतृत्वाखाली ग्रामीण भागात शिवसेनेची पकड अधिक मजबूत होत आहे. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये सक्षम, जनाधार असलेले आणि पक्षाशी निष्ठावान उमेदवार मैदानात उतरवून शिवसेनेची ताकद अधिक मजबूत करण्याचा पक्षाचा मानस असून, या माध्यमातून ग्रामीण भागातील विकासाचा अजेंडा पुढे नेण्याचा निर्धार असल्याचेही जिल्हा प्रमुख सचिन मुळूक यांनी सांगितले.

# मुख्य नाली बांधकामावर बोगसगिरीचा हात?

## रोडच्या साईटनेच नालीला पडू लागले भगदाड ; संबंधित प्रशासनाच्या आशीर्वादाने गुत्तेदाराची कामगिरी !

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरातील मुख्य रस्ता व रस्त्याच्या दोन्ही साईटने नालीचे बांधकाम नुकतेच झाले आहे. रोडच्या नाली साईटने बांधकामाला काही ठिकाणी भदगाड पडले आहे. हे काम संबंधित प्रशासनाच्या शुभ आशीर्वादाने गुत्तेदाराने ही कामगिरी केली आहे का? असा प्रश्न उपस्थित राहत असून काही ठिकाणी तर थातूरमातूर काम केले आहे.

वडवणी ◀◀ पान ३ वर


### पुढाऱ्यांना ना देणे अन् घेणं

सदरील रस्ता व नाले बांधकाम सुरू असताना स्थानिक पुढाऱ्यांनी याकडे न फिरकता दुर्लक्ष केले आहे. तर सदरील काम उत्कृष्ट आणि दर्जेदार होणे गरजेचे असताना हे काम अतिशय निकृष्ट आणि बोगस झाल्याचे बोलले जात आहे. या कामावर लाखो रुपये खर्च करून वायाच जाणार आहेत. तर पावसाळ्यात पावसाचे पाणी झाल्यावर याचा त्रास व्यापाऱ्यांना देखील होणार आहे. या कामाबद्दल स्थानिकचे सर्वच पक्षातील पुढाऱ्यांना ना देणे अन्? घेणे असेच दिसून आले आहे.



# लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

## मोठ्या संख्येने युवकांनी सहभागी व्हावे -संजय आंधळे



वडवणी । प्रतिनिधी

देशभरात रक्ताच्या तीव्र तुटवड्यामुळे अनेकांना योग्य वेळी रक्त न मिळाल्याने जीव गमवावा लागत आहे. सामाजिक बांधिलकीची ही गंभीर गरज ओळखून स्व. गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने अनेक वर्षांपासून सातत्याने रक्तदान शिबिरांचे आयोजन केले जात आहे. गेल्या वर्षी कोरोनाकाळात वडवणीमध्ये झालेल्या रेकॉर्डब्रेक रक्तदानामुळे प्रतिष्ठानच्या उपक्रमाची नोंद सर्वत्र झाली होती. त्याच परंपरेला पुढे नेत यावर्षीही केंद्रीय ग्रामविकासमंत्री लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त दिनांक ११ डिसेंबर रोजी सकाळी १० वा. वडवणी येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकातील भाजपा कार्यालयात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



या शिबिराचे उद्घाटन माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांच्या हस्ते होणार ◀◀ पान ३ वर




**बीड : जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या प्रभारी शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील यांचा सत्कार कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे राज्य उपाध्यक्ष नागसेन धनवे आणि संघटनेच्या इतर पदाधिकाऱ्यांनी सत्कार केला.**

# पंचायत समितीला सिईओ ची अचानक भेट; गैरहजर ९ कर्मचाऱ्यांना नोटीसा

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी अचानक बीड पंचायत समितीला भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी अनुपस्थितीत असलेल्या ९ जणांना तत्काळ कारणे दाखवा नोटीस दिली. समाधानकारक खुलासा न आल्यास कारवाई करण्याचे संकेत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिले आहेत. या भेटीमुळे अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी अनेक दिवसानंतर केलेल्या कारवाईमुळे ते ॲक्शन मोडमध्ये आल्याचे दिसून आले.


या संदर्भात माहिती अशी की, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बुधवार दिनांक १० ऑक्टोबर रोजी बीड पंचायत समितीला अचानक भेट दिली. यावेळी त्यांनी विविध विभागात जाऊन उपस्थित नसलेल्या ९ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची माहिती घेतली. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या भेटीमध्ये सहाय्यक कार्यक्रम अधिकारी- २, डाटा एन्ट्री ऑपरेटर- ४, सहाय्यक लेखाधिकारी- २, कनिष्य लेखाधिकारी- १,आणि कनिष्ठ लिपिक- २ असे ९ अधिकारी आणि कर्मचारी अनुपस्थितीत आढळून आले आहेत. बीड पंचायत समितीमध्ये सुरू असलेल्या विविध विकास कामासंदर्भातही मुख्य कार्यकारी अधिकारी रहमान यांनी कर्मचाऱ्यांना विचारले. यावेळी ९ अधिकारी व कर्मचारी पूर्व परवानगी अथवा रजा न घेता अचानक गैरहजर असल्याचे दिसून आले. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तात्काळ ॲक्शन घेत या अधिकारी व कर्मचाऱ्यांना नोटीस बजावली आहे. दस्तूर खुर्द बीड जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी रहमान यांनी बीड पंचायत समितीला भेट दिली असताना ९ अधिकारी व कर्मचारी अनुपस्थित असल्याचे दिसून आले.

# तहसील कार्यालयाच्या आवारातील कामांवरून नागरिकांमध्ये संभ्रम

## नियमबाह्य बांधकाम, झाडांच्या फांद्या तोडल्यातरी प्रशासन गप्प का?

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तहसील कार्यालयापासून अगदी हाकेच्या अंतरावर सुरू असलेल्या कामामुळे नागरिकांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. अत्यंत महत्त्वाच्या शासकीय आवारात सुरू असलेल्या या कामाचे कोणतेही माहितीफलक, कामाचे तपशील किंवा मंजुरी फलक न लावता काम सुरू ठेवण्यात येत



असल्याने पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.संबंधित कामासाठी कोणती मंजुरी आहे, अंदाजित खर्च किती आहे, ठेकेदार कोण आहे, कामाचा कालावधी काय आहेयासंदर्भात कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. शासकीय कामासाठी नियमांनुसार फलक लावणे अनिवार्य असतानाही हे नियम धाब्यावर बसवले गेल्याने ही चर्चा सुरू आहे.दरम्यान,जुनी तहसील इमारत पाडण्यात आली असून ◀◀ पान ३ वर

# उसाच्या फडामधून केली अल्पवयीन पीडितेची सुटका;आरोपीला घेतले ताब्यात



## अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष बीडची कारवाई

बीड । प्रतिनिधी

बीडच्या मानवी वाहतूक शाखेने सांगली येथे जाऊन उसाच्या फळातून पीडित मुलगी आणि आरोपीची तपासणी करून पीडित मुलीची सुटका केली व आरोपीलाही ताब्यात घेतले.


पोस्टे वडवणी गुन्हा रजिस्टर नंबर १७६/२०२४ कलम १३७(२), १४३(२) हा गुन्हा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे नुकताच वर्ग झाला होता . पोउपनि पल्लवी जाधव यांनी मूळ फाइल चे अवलोकन केले. त्यानंतर फिर्यादी व साक्षीदार यांच्याकडे वारंवार चौकशी करून सुद्धा उपयुक्त माहिती मिळाली नाही. शेवटी तांत्रीक माहितीच्या आधारे कौशल्यपूर्ण तपास करुन पीडित मुलगी व आरोपी यांचे वास्तव्य सांगली जिल्ह्यात असल्याचे समजले. त्यावरून दिनांक ०८/१२/२०२५ रोजी सकाळी ०६:०० वाजता ची टीम ही एसपी यांच्या परवानगीने सांगलीला रवाना झाली. दुपारी सांगली येथे पोहोचल्यावर, टीम पीडित व आरोपीचा शोध घेत होती. दिवसभर शोध घेतल्यानंतर त्यांच्या वास्तव्याचा ठाव-ठिकाणा मिळाल्यावर टीम तेथे दबा धरून बसली होती. शेवटी रात्री ०९:०० वाजे दरम्यान पीडित ◀◀ पान ३ वर

# फुलसांगवीकरांना लागले सुवर्णमहोत्सवी सोहळ्याचे वेध

## भाऊंच्या जन्मभूमीत होणार सप्ताहाचे भव्य नियोजन

शिरूर । प्रतिनिधी

श्री.संत वामनभाऊ महाराज यांच्या जन्मभूमीत फुलसांगवी येथे भाऊंच्या पुण्यतिथी सोहळ्याचा सुवर्ण महोत्सव असल्याने हा महोत्सव ऐतिहासिक सोहळा ठरावा व त्याचा राज्यभर नावलौकिक व्हावा यासाठी ग्रामस्थांच्या वतीने यावर्षी या कार्यक्रमाची व्यापकता वाढवण्याचे नियोजन चालू आहे. वैराग्याचे महामेरू श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या जन्मभूमी मौजे गेल्या पन्नास वर्षांपासून भाऊच्या पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे मोठे थाटामध्ये आयोजन करण्यात येत आहे.







श्री.क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचे संस्थापक मठाधिपती वै.महंत निगमानंद महाराज यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या या सप्ताहाची गेल्या पन्नास वर्षाच्या काळामध्ये वर्षानुवर्षे मोठी व्यापकता वाढत चालली असून हा सप्ताह महाराष्ट्र मध्ये अध्यात्मच्या दृष्टीने भाविक -भक्तापुढे मोठा आदर्श निर्माण करीत आहे.

या सप्ताहाचा यावर्षी ''सुवर्ण महोत्सव असल्याने याची दर वर्षीच्या तुलनेते आगळी वेगळी मोठी व्यापकता वाढवण्यात आली आहे. श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथगडाची मठाधिपती महंत जनार्धन महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली हा सप्ताह शनिवार दि. ३ जानेवारी पासून आरंभीत होत आहे. गावकऱ्यांच्या वतीने यावर्षी सुवर्ण महोत्सव वर्षी सप्ताहाचे व्यापकता वाढवण्यात आली आहे . महाराष्ट्रभरातून नामांकित कथाकार, कीर्तनकारांना, समाज प्रबोधनकार, संगीतकार आदी मान्यवरांना निमंत्रणे देऊन भाविक भक्तांसाठी एका प्रकारचे अध्यात्मिक पर्वणीच या ठिकाणी आयोजित करण्यात आलेली आहे. हा सप्ताह सोहळा अवघ्या तीन आठवड्यावर येऊन ठेपल्याने ◀◀ पान ३ वर

# स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त गेवराईत आज रक्तदान शिबिराचे आयोजन

मादळमोही । प्रतिनिधी

लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी, गेवराईच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून हा उपक्रम मानवी सेवेचा सर्वोत्तम संकल्प ठरणार आहे. रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान या भावनेतून आज गुरुवार दि. ११ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता, भाजप कार्यालय, जुने बसस्टँड, जालना रोड, गेवराई येथे हे शिबिर होणार असून या शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन भाजपचे गेवराई तालुका समन्वयक श्रीकांत सानप यांनी केले आहे.



भाजपच्या मंत्री पंकजाताई मुंडे, मा.खा.प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई याठिकाणी स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी राज्यमंत्री बदामराव पंडित हे तर रक्तदान शिबिराचे उद्घाटन भाजप नेते बाळराजे पवार यांच्या हस्ते होणार आहे. तसेच या सामाजिक उपक्रमासाठी सर्जेराव तांदळे (भाजपा प्रदेश कार्यसमिती सदस्य), युधाजित दादा पंडित (मा.जिल्हा परिषद सभापती), नवनाथ आण्णा शिराळे (भाजपा जिल्हा उपाध्यक्ष), देविदास नागरगोजे सर (भाजपा नेते), पी.टी. चव्हाण (भाजपा नेते), प्रकाश काका सुरवसे (भाजपा ज्येष्ठ नेते), सुशील जवंजाळ (मा.नगराध्यक्ष), गणेश लांडे (जिल्हा सरचिटणीस), ◀◀ पान ३ वर


This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# शीतल तेजवानीचा आणखी एक कारनामा, अभिनेता रणबीर कपूरवर ५० लाखांचा दावा ठोकला

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणात (डरपव डलरा झींपश) अटकेत असलेल्या, शीतल तेजवानीचा (डहशशींरश्र ढशक्षुरपळ) आणखी एक कारनामा समोर आला आहे. आरोपी शीतल तेजवानीने अभिनेता रणबीर कपूरवर नुकसान भरपाईचा दावा ठोकला आहे. शीतलने रणबीर कपूरच्या पुण्यातील अपार्टमेंटच्या भाडेकरारातील अटी पाळल्या नाहीत, असा आरोप करत त्याच्यावर दावा दाखल केला आहे. तसंच नुकसानभरपाई म्हणून ५० लाख ४० हजार रुपयांची नुकसानभरपाई मागितली आहे.



अभिनेता रणबीर कपूरचे पुण्यातील ट्रम्प टॉवर्समध्ये फ्लॅट्स आहेत. शीतल तेजवानीने करारात नमूद केलेल्या लॉक-इन कालावधीच्या आधीच घरातून काढून टाकण्यात आल्याबद्दल नुकसानभरपाई मागितली होती. तसेच त्यावर व्याजाची मागणी केली. हा दावा पुणे दिवाणी न्यायालयात दाखल करण्यात आला असून तेजवानीने एकूण ५० लाख ४० हजार रुपयांची नुकसानभरपाई मागितली आहे. पुणे येथील मुंढव्यातील ४० एकर जमीन गैरव्यवहार प्रकरणी आरोपी शीतल तेजवानीला पुणे पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणात शीतल तेजवानी मुख्य आरोपी असून तिची या आधी चौकशी देखील करण्यात आली होती.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या कंपनीसाठी ही जमीन खरेदी करण्यात आली होती. दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणातील मुख्य सुत्रधार म्हणून शीतल तेजवानीची याआधी दोन वेळा चौकशी केली होती. चौकशीत उघड झालेल्या बाबींवरून शीतल तेजवानीचा जमिनीच्या गैरव्यवहारात थेट सहभाग असल्याचे स्पष्ट झाल्यावर अखेर अटकेची कारवाई करण्यात आली. मुंढवा जमीन प्रकरण हे ४० एकर जागेचं प्रकरण आहे. ही जागा आधी महार वतनाची होती. मग ती राज्य सरकारला आणि त्यानंतर केंद्र सरकारच्या बोटॅनिकल गार्डनला देण्यात आली. सुमारे १८०० कोटीची ही जमीन पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीला ३०० कोटींमध्ये विकण्यात आली. त्यासाठीची २१ कोटींची स्टॅम्प ड्युटी माफ करण्यात आली आणि हा व्यवहार फक्त ५०० रुपयांच्या स्टॅम्प ड्युटीवर करण्यात आला.मुंढवा भागातील ४० एकर जागा ज्यांना वतन म्हणून देण्यात आली होती त्यांच्या वंशजांकडून शीतल तेजवानीने पॉवर ऑफ ॲटर्नी मिळवली आणि त्यानंतर ती जागा पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीला विकण्यात आली.

# आंदेकर कुटुंबाचा निवडणूक लढविण्याचा मार्ग मोकळा; विशेष मकोका न्यायालयाचा महत्वाचा निर्णय

पुणे । प्रतिनिधी

नातवाच्या निर्घृण हत्येप्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेले कुख्यात बंडू आंदेकर, त्यांची भावजय व माजी नगरसेविका लक्ष्मी आंदेकर तसेच माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्या पत्नी सोनाली आंदेकर यांना पुणे महापालिकेची आगामी निवडणूक लढविण्यास विशेष मकोका न्यायालयाने परवानगी दिली आहे.



'निवडणूक लढविणे हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार असून त्यासाठी न्यायालयाच्या परवानगीची आवश्यकता नाही,' असे स्पष्ट करत विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी तिघा आरोपींवर कोणताही निवडणूक-प्रतिबंध नसल्याचे नमूद केले. नाना पेठ परिसरात ५ सप्टेंबर रोजी आयुष कोमकर (गणेश कोमकरचा मुलगा व वनराज आंदेकर हत्याकांडातील आरोपी) याची गोळ्या घालून हत्या झाली होती. या प्रकरणात आंदेकर टोळीचा प्रमुख बंडू उर्फ सूर्यकांत राणोजी आंदेकर (७०), लक्ष्मी उदयकांत आंदेकर (६०) आणि सोनाली वनराज आंदेकर (३६) यांच्यासह सुमारे १५ आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.

महापालिका निवडणुकीसाठी परवानगी मागणारा अर्ज ॲड. मिथुन चव्हाण यांच्या माध्यमातून सादर करण्यात आला. लोकप्रतिनिधित्व कायद्यानुसार आरोपींना निवडणूक अर्ज दाखल करण्याचा अधिकार असल्याचा युक्तिवाद त्यांनी न्यायालयात केला. न्यायालयाने हा युक्तिवाद मान्य करत तिघा आरोपींना नियमानुसार निवडणूक लढविण्याची मुभा दिली. न्यायालयाने पुढे स्पष्ट केले की, नामांकनपत्र दाखल करणे किंवा निवडणुकीसाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करताना पोलिस बंदोबस्ताची गरज भासल्यास त्यासाठी स्वतंत्र अर्ज दाखल करावा; संबंधित परिस्थितीचा विचार करून त्यावर आदेश दिले जातील.

# पुण्यातील कसबा गणपती मंदिर १५ डिसेंबरपासून बंद !

पुणे । प्रतिनिधी

पुण्याचे ग्रामदैवत असलेल्या श्री कसबा गणपतीवरील सिंदूरलेपन दूर करण्यात येणार असून, भाविकांना मूळ मूर्तीचे दर्शन घडणार आहे. ही प्रक्रिया १५ डिसेंबरपासून सुरू करण्यात येणार असून प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मंदिर बंद ठेवण्यात येणार आहे. याविषयी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त विनायक बाजीराव ठकार यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत माहिती दिली. मंदिराच्या आतापर्यंतच्या उपलब्ध असलेल्या इतिहासात अशी प्रक्रिया प्रथमच घडत असल्याचे ठकार म्हणाले. यावेळी देवस्थानचे खजिनदार हेरंब ठकार, विश्वस्त संगीता ठकार, स्वानंद ठकार, आशापूरक ठकार, मिहीर ठकार, मंदार ठकार, तेजस ठकार, हर्षद ठकार उपस्थित होते.



गेल्या काही दिवसांपासून ऐतिहासिक पुरातन स्वयंभू श्रीं च्या मूर्तीवरील शेंदूर मिश्रित कवच गळून पडत आहे. ग्रामदैवत श्री कसबा गणपती तमाम गणेशभक्तांचे नवसाला पावणारे आराध्यदैवत आहे. त्यामुळे भविष्यात कुठलाही दुर्धर प्रसंग उद्भवू नये, म्हणून सध्या असलेले शेंदूर कवच लवकरात लवकर काढणे अत्यंत आवश्यक आहे. याकरिता शेंदूर कवच दुरुस्ती प्रक्रिया करण्यात येणार आहे. शेंदूर कवच काढण्यासाठी विविध मूर्तीतज्ज्ञ, धार्मिक क्षेत्रातील तज्ज्ञ तसेच पुरातत्व खात्याकडूनही मार्गदर्शन घेण्यात आले आहे. ही संपूर्ण प्रक्रिया विधिवत आणि शास्त्रोक्त पद्धतीने या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. ही प्रक्रिया विशेषत: श्रींच्या मुख्य रोजच्या पूजेच्या मूर्तीवर करण्यात येणार आहे. शेंदूर कवच काढणे आणि त्याअनुषंगाने आवश्यक ती कामे ही सर्व प्रक्रिया अतिशय संवेदनशील असल्यामुळे साधारण तीन आठवडे लागणे अपेक्षित आहे. कदाचित हा कालावधी कमी होऊ शकतो किंवा वाढूही शकतो. मात्र याचा अंदाज प्रत्यक्ष काम सुरू झाल्यावरच येईल. इथून पुढे होणाऱ्या कामाचा योग्य आढावा घेऊन मंदिर लवकरात लवकर भाविकांसाठी खुले करण्याचा व्यवस्थापन समितीचा अत्यंत प्रामाणिक मनोदय आहे, असे ठकार म्हणाले. पुण्यातील अतिप्राचीन मंदिरांपैकी एक, ग्रामदैवत अशी कालातीत उपाधी प्राप्त असलेले श्री कसबा गणपती मंदिर अनेक कारणांसाठी इतिहासात प्रसिद्ध आहे. इसवी सन १६१४ च्या आसपास या मंदिराचे उल्लेख आढळतात. जय मिळवून देणारा असा 'जयति गजानन' असे प्रत्यक्ष छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्याचे वर्णन केले आहे.

# आयुक्त नवल किशोर राम यांनी केली वाघोली-चऱ्होली रिंगरोडमध्ये बाधित जागा मालकांशी चर्चा

विश्रांतवाडी । प्रतिनिधी

वाघोली ते चऱ्होलीहद्दीपर्यंतचा रिंगरोड विकसित करण्यात येणार आहे. या रिंगरोडमुळे नगर रोड, सोलापूर रोड, नाशिक रोड, मुंबई रोड जोडले जाणार आहेत. यामुळे वाहतूक कोंडीची समस्या दूर होण्यास नक्कीच मदत होइल. वाघोलीपासून चऱ्होली हद्दीदरम्यानच्या सुमारे साडे पाच किलोमीटर अंतराराचा रस्ता विकसित करण्यासाठी जागा ताब्यात घेण्याबाबत प्रशासनाच्यावतीने प्रक्रिया सुरू आहे. यासाठी आयुक्त नवल किशोर राम यांनी लोहगावातील स्थानिक शेतकऱ्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीत आयुक्त व शेतकरी यांच्यामध्ये सकारात्मक चर्चा झाली.



आयुक्तांच्या दालनात पार पडलेल्या बैठकीत आयुक्त नवल किशोर राम, पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर, बांधकाम विभागासह मनपाच्या विविध खात्याचे अधिकारी, हवेली तालुका पंचायत समितीचे माजी सभापती अशोकबापू खांदवे, गणेश खांदवे, सुधीर काळभोर, प्रवीण खांदवे, निलेश खांदवे, युवराज खांदवे, पप्पू खांदवे, प्रतीक खांदवे व लोहगावातील स्थानिक जागा मालक उपस्थित होते. यावेळी अशोकबापू खांदवे यांनी आयुक्तांशी चर्चा केली. ते म्हणाले, ६५ मीटर रुंदीचा हा रिंगरोड असून रस्त्याच्या एका बाजूला १२ मीटर तर दुसऱ्या बाजूला २४ मीटर रुंदीचा सर्व्हिस रस्ता करण्यासाठी प्रारूप आराखड्यात आरक्षित करण्यात आला आहे. ६५ मीटर रस्त्यांमध्येच अनेक जणांच्या जमिनी व घरे बाधित होणार आहेत. त्यामध्ये अनेकजणांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे. त्यामुळे दोन्ही सर्व्हिस रस्ते रद्द करण्याची मागणी लोहगावकर शेतकऱ्यांच्यावतीने खांदवे यांनी केली. ज्यांच्या जमिनी रस्त्यामध्ये बाधित होणार आहेत त्या जागा मालकांना पाच पट मोबदला द्यावा.त्या जागा मालकांच्या इतरत्र असलेल्या जमिनीवर आरक्षण टाकू नये. जरी टाकले असल्यास ते रद्द करण्यात यावे. पठारे वस्तीवरील ३६ मीटर रुंदीचा रस्ता कमी रुंदीचा करण्यात यावा, जेणेकरून नागरिकांची घरे वाचतील. रिंगरोड मध्ये बाधित होणाऱ्या एक दोन गुंठे प्लॉट धारकांना पक्क्या स्वरूपातील टीडीआर द्यावा, अशा मागण्या आयुक्तांशी झालेल्या चर्चेत अशोकबापू खांदवे यांनी केल्या आहेत. यावेळी आयुक्त नवल किशोर राम यांनी सकारात्मकता दर्शवली असल्याचे खांदवे म्हणाले.

# पोर्शे कार अपघातात मोठी कारवाई !

## पीआय राहुल जगदाळे आणि तोडकरी सेवेतून बडतर्फ

पुणे । प्रतिनिधी

मागच्या वर्षी मोठ्या प्रमाणात चर्चेत असलेल्या पुणे पोर्शे कार अपघात (झ्रीेलहश उरी –ललळवशपीं) प्रकरणात राज्य सरकारने मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणी येरवडा पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल जगदाळे आणि सहायक पोलीस निरीक्षक विश्वनाथ तोडकरी यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे.

काय होतं नेमकं प्रकरण?



पुण्यातील कल्याणीनगरमध्ये १९ मे २०२४ रोजी १७ वर्षीय अल्पवयीन मुलाने त्याच्या पोर्शे या लक्झरी कारने दुचाकीस्वारांना धडक दिली, त्यात दोघांचा मृत्यू झाला होता. बांधकाम व्यावसायिकाच्या पोरगा वेदांत अग्रवाल याने मद्यधुंद अवस्थेत अनिश अवधिया आणि अश्विनी कोष्टा या दोन तरुणांना चिरडले होते. यामध्ये सर्वात धक्कादायक गोष्ट म्हणजे या प्रकरणानंतर आरोपीच्या रक्ताचे नमुने बदलण्यापर्यंत प्रकरण गेले होते. यामध्ये पोलिसांनी आरोपीला मदत केल्याचे आरोप करण्यात आला होता. यामुळे संपूर्ण राज्यात संताप व्यक्त करण्यात आला होता.

अधिकाऱ्यांचे निलंबन

दरम्यान आज या प्रकरणी कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत येरवडा पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल जगदाळे आणि सहायक पोलीस निरीक्षक विश्वनाथ तोडकरी यांना शासकीय सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. सुमारे दीड वर्षानंतर हि कारवाई करण्यात आली आहे. तसेच पोलीस शिपाई अमित शिंदे आणि आनंदा भोसले या दोघांना पाच वर्ष पदाच्या मूळ वेतनावर ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

आरोपीला जामीन मिळाल्याने संतापाची लाट

आरोपीने गुन्हा केला त्यावेळी तो १७ वर्षे ८ महिन्यांचा होता. केवळ चार महिने बाकी असल्याने त्याला प्रौढ म्हणून वागवण्याची मागणी पुणे पोलिसांनी न्यायालयाला केली होती. मात्र बाल न्याय मंडळाने अवघ्या १४ तासांत आरोपीला १०० शब्दांचा निबंध लिहायला सांगून जामीन मंजूर केला होता. यामुळे संपूर्ण देशात संताप व्यक्त करण्यात आला होता.

# हातभट्टी दारू विक्रेत्यावर एमपीडीए; थेट आॅर्थर रोड कारागृहात रवानगी

पुणे ।प्रतिनिधी

वारंवार कारवाई करूनही अवैध हातभट्टी दारू विक्रीचा बेकायदेशीर व्यवसाय न सोडणाऱ्या विक्रेत्यावर अखेर उत्पादन शुल्क विभागाने (एक्साईज) 'एमपीडीए' कायद्याअंतर्गत स्थानबद्धतेची कारवाई केली.

राहुल व्यंकट राठोड (वय ३०, रा. काळेशिवार शिंदवणे, ता. हवेली) असे स्थानबद्ध केलेल्याचे नाव असून, थेट त्याची रवानगी मुंबईतील आॅर्थर रोड कारागृहात करण्यात आली आहे. दरम्यान, या कारवाईमुळे जिल्ह्यातील हातभट्टी दारू बनविणाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. राठोड याच्यावर यापूर्वीही महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ अंतर्गत ४ गुन्हे दाखल झाले होते. त्याच्या सततच्या बेकायदेशीर कारवायांमुळे त्याच्याकडून एका लाख रुपये किमतीचे चांगल्या वर्तनाचे बंधपत्र घेतले होते. मात्र, ते असूनही राठोड याने आपली कृत्ये न थांबवता धोकादायक रसायनांचा वापर करून हातभट्टी दारू तयार करणे आणि विक्री करणे सुरू ठेवले. पुन्हा पुन्हा होत असलेल्या गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक अतुल कानडे यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथकाच्या निरीक्षकांनी राठोड याच्यावर एमपीडीए कारवाईचा प्रस्ताव तयार केला. हा प्रस्ताव तपासून जिल्हाधिकाऱ्यांनी त्यास मंजुरी दिली. त्यानुसार राठोडला थेट आॅर्थर रोड कारागृह, मुंबईत स्थानबद्ध केले आहे. अधीक्षक अतुल कानडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपअधीक्षक उत्तम शिंदे, दुय्यम निरीक्षक किरण पाटील, प्रियंका कारंडे, शंकर हाके, रोहित माने, स्वप्निल कदम यांच्यासह पथकाने ही कारवाई केली.

# स्वसंरक्षणाचे प्रशिक्षणही गरजेचे-रमेश बागवे

पुणे । प्रतिनिधी

बदलती सामाजिक स्थिती पाहता आता मुलींनी शिक्षणासोबतच स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण घेतले पाहिजे. त्यात, प्रामुख्याने बॉक्सिंग व कराटेचे प्रशिक्षण गरजेचे असल्याचे माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे यांनी सांगितले.



काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे एकता प्रतिष्ठान व मुक्ता फाउंडेशन यांच्या वतीने भवानी पेठ येथील बापूसाहेब पवार कन्या शाळेतील इयत्ता दहावीच्या गरजू विद्यार्थ्यांना मोफत अपेक्षितांचा संच वाटप करण्यात आले, यावेळी बागवे बोलत होते. रमेश बागवे म्हणाले की, मोबाइलचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. तेव्हा विद्यार्थ्यांनी मोबाइलचा वापर हा फक्त शिक्षणासाठीच करावा. तसेच. आम्ही जनरल अरुणकुमार वैद्य स्टेडियम या ठिकाणी कराटे व बॉक्सिंग प्रशिक्षण मागील अनेक वर्षांपासून देत आहोत.

आपल्या शाळेतील मुलींना खेळाचे प्रशिक्षण द्यायचे असेल तर संबंधीतांनी याचा लाभ घ्यावा, त्यांना मोफत प्रशिक्षण देण्यात येइल असेही बागवे म्हणाले. माजी नगरसेवक अविनाश बागवे, इंदिरा बागवे, विठ्ठल थोरात, अरुण गायकवाड, सुनील बावकर, दयानंद अडागळे, जयदीप शेलार, हुसेन शेख, मारुती कसबे, आदित्य गायकवाड यावेळी उपस्थित होते.

# सोसायट्यांवर होणार दंडात्मक कारवाई

## बंद कचरा प्रक्रिया प्रकल्प तातडीने सुरू करण्याची नोटीस

पुणे । प्रतिनिधी

शहरातील शंभर किलोपेक्षा जास्त ओला कचरा निर्माण करणाऱ्या हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, व्यापारी संकुले, संस्था, आस्थापना आणि सोसायट्यांनी स्वतःच्या परिसरात ओला कचरा प्रक्रिया प्रकल्प सुरू ठेवणे बंधनकारक आहे. मात्र, महापालिकेच्या सर्वेक्षणात तब्बल ६०० पेक्षा जास्त संस्था व सोसायट्यांमध्ये हे प्रकल्प बंद असून, ते तातडीने सुरू करण्याची नोटीस या सोसायट्यांना दिली जाणार आहे.



ज्या सोसायट्यांचे प्रकल्प बंद असतील, त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी दिले आहेत.

महापालिकेच्या क्षेत्रात १०० किलोपेक्षा जास्त ओला कचरा निर्माण करणाऱ्या सर्व संस्था व सोसायट्यांसाठी कचरा प्रक्रिया प्रकल्प अनिवार्य करण्यात आले आहेत. शहरात अशा सुमारे दोन हजारपेक्षा अधिक ठिकाणी हे प्रक्रिया प्रकल्प असल्याची नोंद आहे. त्यानुसार महापालिकेकडून तपासणी करण्यात आल्यानंतर या तपासणीत सहाशेपेक्षा अधिक प्रकल्प बंद असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे त्यांना तातडीने नोटीस बजावण्यात येणार आहे. याबाबत माहिती देताना अतिरिक्त आयुक्त म्हणाल्या, की शहरातील आस्थापना शंभर किलोपेक्षा जास्त ओला कचरा तयार करतात. त्यांना २००० च्या बांधकाम नियमावलीनुसार स्वतःच कचऱ्यावर प्रक्रिया करणे बंधनकारक आहे. शहरात अशा १९४२ आस्थापना असून, त्यांच्याकडून दररोज २० टनपेक्षा अधिक कचऱ्याची विल्हेवाट लावली जाणे अपेक्षित आहे. मात्र, पाहणीत प्रत्यक्ष स्थिती वेगळी असल्याचे दिसून आले. त्यामुळे तातडीने बंद प्रकल्प सुरू करण्यास सांगण्यात आले आहे, तसेच ज्या संस्थांना प्रकल्प सुरू करण्यात अडचणी आहेत. त्यांच्यासाठी वेगवेगळ्या प्रक्रियांच्या तंत्रज्ञानाची माहिती, तसेच सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कंपन्यांचे पॅनेल नियुक्ती केले आहे, तसेच याची माहितीही सोसायट्यांना देण्यात आली आहे. त्यामुळे या पुढे प्रकल्प बंद असल्यास दंडात्मक कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# भोपाळ ते पुणे हॉट एअर बलून मोहिमेचा भारतात नवा इतिहास!

पुणे । प्रतिनिधी

भारतीय लष्कराच्या भोपाळ ते पुणे या हॉट एअर बलुनिंग मोहिमेत बुधवारी पुण्यात हिरवा झेंडा दाखवून स्वागत करण्यात आले. या अनोख्या मोहिमेने एक वेगळा इतिहास रचला आहे. भोपाळमधील ईएमई सेंटर येथील हॉट एअर बलुनिंग नोडने भारतीय लष्कराच्या साहसी विंगच्या नेतृत्वात आयोजित केलेल्या या मोहिमेला ३० नोव्हेंबरला हिरवा झेंडा दाखवण्यात होता. तब्बल ७५० किलोमीटरहून अधिक हवाई प्रवास करताना संघाने मध्य प्रदेशातील नर्मदा खोऱ्यापासून महाराष्ट्रातील पश्चिम घाटापर्यंत विविध भूप्रदेशांचा प्रवास केला आणि महू, छ. संभाजीनगर, अहिल्यानगर येथे नियोजित थांबे घेतले.




प्रत्येक ठिकाणी संघाने स्थानिक तरुणांशी संवाद साधला, त्यांना या अनोख्या साहसी खेळाचे साक्षीदार होण्याची आणि राष्ट्रभावना वाढवण्यासाठी भारतीय सैन्याच्या वचनबद्धतेबद्दल जाणून घेण्याची संधी दिली. या मोहिमेचे एक प्रमुख आकर्षण म्हणजे ८ तास ४४ मिनिटांचे विक्रमी विनाथांबा हॉट एअर बलून उड्डाण, ज्यामुळे त्याला भारतातील सर्वात जास्त कालावधीच्या हॉट एअर बलून उड्डाणाचा मान मिळून एशियन बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये स्थान मिळाले. ही उल्लेखनीय कामगिरी संघसामर्थ्य आणि विमानचालन उत्कृष्टतेसाठीचा उत्तम नमुना ठरली. संपूर्ण मोहिमेदरम्यान चमूने विद्यार्थी आणि तरुण इच्छुकांशी सक्रियपणे संवाद साधला. साहसाला जीवनशैली म्हणून प्रोत्साहन दिले आणि सशस्त्र दलांमध्ये रस निर्माण केला. प्रेरक भाषणे, प्रात्यक्षिके आणि संपर्क कार्यक्रमांनी लष्करी जीवनाची व्याख्या करणाऱ्या धैर्य, शिस्त आणि संघकार्याच्या मूल्यांवर प्रकाश टाकला. दक्षिण कमांडचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांनी विक्रमी कामगिरीबद्दल संघाचे अभिनंदन केले आणि त्यांचा दृढनिश्चय, धैर्य आणि साहसी वृत्तीचे कौतुक केले. अशा अग्रगण्य उपक्रमांमुळे सैन्यातील साहसी संस्कृती बळकट होते आणि तरुणांशी जोडण्यासाठी एक शक्तिशाली माध्यम म्हणून काम करते, असे त्यांनी स्पष्ट केले. भारतीय लष्कराच्या वतीने भोपाळ ते पुणे असा बलूनच्या माध्यमातून सैनिकांनी प्रवास केला यात त्यांनी देशसेवेचा अनोखा संदेश देत तरुणांना अनोखा संदेश दिला